मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया

(मराठी)

अंक ७ • वर्ष १५ वे • पृष्ठे ५२ • जुलै - २०१८



# हसती दुनिया (मराठी)

**बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट**


अंक ७ • वर्ष १५ वे • पृष्ठे ५२ • जुलै २०१८



संपादक
राजेंद्र थोरात

सहसंपादक
सुरेश तिर्लोटकर

सजावट व चित्रे
उदय सत्यवान पांगे
राजनंदन पिंपळकर



संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका एम.पी.प्रिंटर्स, बी-२२०, फेज-II, नोएडा-२०१३०५, जिल्हा-गौतम बुध्द नगर (उत्तर प्रदेश) येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -४०० ०१४. येथे प्रकाशित केली.



कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
ई-मेल
marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org


| वर्गणी | १ वर्ष | ५ वर्षे |
|---|---|---|
| भारत/ नेपाळ | रु. १५०/- | रु. ७००/- |
| यु.के. | £ 15 | £ 80 |
| युरोप | € 20 | € 100 |
| अमेरिका | $ 25 | $ 120 |
| कनाडा/ ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 140 |

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९








## कथा


- रावणाला शाप ०६
- मिशन कचरामुक्ती ०८
- पारख १४
- परिस्थितीची जाण ४२
- मिठासारखं प्रेम ४४
- क्रोधाचे पिशाच्च ४९

## स्तंभ


- दोन शब्द ०४
- शब्दकोडे १०
- दादाला विचारु या ११
- विचारपुष्प १२
- आरोग्याचा मंत्र २४
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे २८
- दिव्यवाणी ३०
- हसा मुलांनो हसा ३२
- सामान्य ज्ञान ४६
- चित्र काढा आणि रंग भरा ५०


## विशेष व प्रेरक प्रसंग


- विश्वनाथ का. राजवाडे ०५
- तेजस्विनी -७५ २०
- दुर्गभ्रमंती २२
- बेताज पातशहा-भापाजी २९
- पुण्यात पाच मुलींनी ... ३१
- समर्थ दर्शन -४५ ३४
- अहंकारापासून दूर राहा ३५
- आपले जिल्हे ४०
- पक्षीजगत ४७
- करियरच्या नावाने ..... ४८








## चित्रकथा


- आजोबा १६
- किट्टी ३६





## कविता


- बळीराजा आनंदित झाला २१
- वरुण राजा ४१
- रिमझिम धारा ४३

# मानसिकता बदलावी

सुमारे ७३ वर्षांपूर्वीची ही घटना आहे. दुसऱ्या महायुध्दात अमेरिकेने जपानविरुध्द अणुबॉम्बचा उपयोग केला. नागासाकी आणि हिरोशिमा ही शहरे उद्ध्वस्त झाली. लाखो लोक मारले गेले. पराभव, दु:ख आणि विनाश यामुळे सारा देश होत्याचा नव्हता झाला; परंतु फिनिक्स पक्ष्याप्रमाणे या राखेतूनही जपानने आपले डोके वर काढले. अल्पकाळातच तो देश समृध्द व प्रगत झाला. हा चमत्कार कसा झाला ? याचं कारण जपानी जनतेच्या राष्ट्रप्रेमामुळे. उद्योग, कष्ट, सचोटी या गुणांमुळे.

जपानचा पराभव झाल्यानंतर एका अमेरिकन उद्योगसमूहाने आपली शाखा जपानमध्ये उघडली. अमेरिकन प्रथेप्रमाणे कर्मचाऱ्यांसाठी फक्त पाच दिवसांचा आठवडा ठेवला.

दोन दिवस पूर्ण सुट्टी; परंतु जपानी कामगारांनी मात्र त्यास विरोध केला. व्यवस्थापकांना मोठे आश्चर्य वाटले. त्यांनी कामगारांना विचारले, "तुमचा विरोध कशासाठी आहे ? आम्ही तर तुम्हाला आराम देत आहोत. तुम्ही उलट खूश असायला हवं." सर्व कर्मचारी एका सुरात म्हणाले, "आरामामुळे आम्ही आळशी बनू. आमचे राष्ट्रीय पतन होईल. आरोग्य धोक्यात येईल. फालतू गोष्टींवरील खर्च वाढेल. जी सुट्टी, जो आराम आम्हाला वाईट सवयी लावेल, आमची शारीरिक, मानसिक, आर्थिक स्थिती बिघडवेल तो आम्हाला नको आहे. आठवड्यातून एक दिवस सुट्टी आम्हाला पुरेशी आहे."

ज्या देशातील लोक कष्ट व उद्योग यांची कास धरतात, त्यांचा विकास झाल्यावाचून राहत नाही. परिश्रमांशिवाय प्रारब्ध बदलत नाही. आळसाने खंगून जाण्यापेक्षा श्रम करीत झिजून जाणे अधिक चांगले, नाही का ?

आज आपल्या देशाची लोकसंख्या भरमसाठ वाढत आहे. साधनसंपत्तीचा तुटवडा पडत आहे. प्रदूषण वाढत आहे. भ्रष्टाचार वाढत आहे. लोक कष्ट न करता जास्त संपत्ती कमविण्यासाठी नवीन युक्त्या शोधून काढत आहेत. दुसऱ्याची फसवणूक करुन आपली घरं भरत आहेत. याचं कारण आहे, आपली मानसिकता! जपानी लोकांची मानसिकता आणि आपली मानसिकता याची तुलना केली तर आपल्याला आपलीच लाज वाटू लागेल. देश प्रगतीपथावर जातो तो तेथील देशवासीयांमुळे! आज जपान सर्वच क्षेत्रात प्रगत आहे. आपल्याकडे साधनसुविधांचा सुकाळ असूनही त्यामानाने आपण खूपच मागे आहोत. याचं कारण स्वार्थ व संकुचितपणा. सार्वजनिक स्वच्छता, प्रदूषण याविषयी आपण कमालीचे उदासीन आणि निष्काळजी बनलो आहोत. मनामनातील दुर्भाव दूर करुन प्रत्येक मनात परोपकाराचा, विशालतेचा, दयेचा, सौहार्दाचा भाव निर्माण होण्यासाठी प्रत्येकाला स्वत:ची म्हणजे स्वत:च्या मूळ रुपाची ओळख व्हायला हवी. तेव्हाच स्वार्थ, आळस, निष्काळजीपणा इ. दुर्भाव दूर होऊन माणूस स्वत:ही प्रगती करील आणि देशालाही प्रगतीपथावर नेण्यास सहाय्यक होईल.

- राजेंद्र थोरात..

# विश्वनाथ काशीनाथ राजवाडे



राजवाडे यांचा जन्म १२ जुलै १८६३ रोजी पुण्यामध्ये झाला. हे मराठी इतिहास संशोधक होते. त्यांनी संपादित केलेले मराठ्यांच्या इतिहासाची साधने ह्या ग्रंथाचे २२ खंड हे मराठा साम्राज्याच्या इतिहासाच्या अभ्यासासाठीचे महत्त्वाचे साधन मानले जाते.

बी.ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये काही दिवस शिक्षक म्हणून काम केले. इंग्रजी भाषेतील उत्कृष्ट ग्रंथांचे भाषांतर करुन ते प्रकाशात आणण्यासाठी त्यांनी भाषांतर नावाचे मासिक सुरु केले होते.

१८९८ साली त्यांनी लिहिलेल्या मराठ्यांच्या इतिहासाची साधने या ग्रंथाचा पहिला खंड प्रकाशित झाला. ७ जुलै, १९१० रोजी भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना त्यांच्या पुढाकाराने झाली. मराठी भाषेचा त्यांना स्वाभिमान होता. ते म्हणायचे, ज्ञानार्जनाची हौस असेल तर माझी मराठी भाषा पाश्चिमात्त्य लोकही शिकतील; माझ्या ग्रंथांची पूजा करतील. मी परकीय भाषेत माझा ग्रंथ लिहिणार नाही. मी किर्तीला हपापलेला नाही.

राजवाडे यांनी आजन्म भ्रमंती करुन मराठ्यांच्या इतिहासाचे दस्तऐवज जमवले आणि अस्सल साधनांचे बावीस खंड संपादित करुन प्रसिध्द केले. याचबरोबर अनेक ग्रंथ संपादले. इतिहासाचे मूलगामी भाष्यकार असणाऱ्या राजवाडेंचा निर्मत्सर, तटस्थ, निरहंकार व निर्लेप वृत्तीने इतिहास लिहिण्याचा आग्रह असे. पुण्यातील भारत इतिहास संशोधन मंडळाची स्थापना करणाऱ्या राजवाडे यांनी समाजशास्त्र व आरोग्य मंडळं स्थापन केली. स्वभाषेच्या आणि स्वदेशाच्या इतिहासातून स्वाभिमान जागृत करुन सामान्यजनास संघर्षाला प्रवृत्त करण्याचेच जीवितकार्य मानलेले राजवाडे अत्यंत आग्रही व एककल्ली स्वभावाचे होते. मराठीतून इतिहास, भाषाशास्त्र, व्याकरण, व्युत्पत्तिशास्त्राचे व्यासंगपूर्ण संशोधन हेच सर्वस्व मानलेल्या राजवाडेंनी कीर्ती, संपत्ती व अधिकाराचा मोह टाळून एकनिष्ठ वृत्तीने ज्ञानोपासना केली. असा हा इतिहासाचार्य ३१ डिसेंबर, १९२६ रोजी धुळे येथे काळाच्या पडद्याआड गेला.

पौराणिक कथा

# रावणाला शाप

रावणाने पळवून आणलेल्या स्त्रिया विमानातून उतरल्यावर विभीषणाला मोठा खेद वाटला. तो सात्विक संतापाने म्हणाला, "राजन, तुझं वर्तन कुलाचा नाश करणारं आहे. तुझ्या वर्तनाला जशास तसं उत्तर मिळालं आहे. मधू नावाच्या राक्षसाने आपली मावसबहीण कुंभिनसीचं अपहरण केलं आहे." या गोष्टीमुळे राक्षसराज रावण क्षोभित झाला व मधूराक्षसाचा शोध घेत निघाला. त्याला प्रथम कुंभिनसी भेटली. तलवारीवर हात ठेवीत रागारागाने त्याने मधूराक्षसाची चौकशी केली. रावणाचा हेतू लक्षात आल्याने कुंभिनसी भयभीत झाली. तिने राक्षसराजाच्या चरणावर मस्तक ठेवले व म्हटले, "महाबाहो, माझ्या पतीचा वध करु नका. कारण वैधव्य हेच नारीसाठी सगळ्यात मोठं भय व संकट होय." मग रावणाने अभय देत मधूराक्षसाला बोलावून घेऊन येण्यास सांगितले. मधूराक्षसाची व रावणाची भेट झाली. मधूने व कुंभिनसीने मिळून रावणाचा सत्कार केला. रावण त्यांच्याकडे एक रात्र मुक्कामी राहिला. आपल्या बहिणीच्या पाहुणचाराने तृप्त झाला.

आपल्या सेनेसह रावणाचा मुक्काम कैलासपर्वतावर होता. सारे जग निद्रिस्त असताना रावण मात्र चांदण्या रात्री विहार करीत फिरत होता. कैलासपर्वतावरच्या सृष्टीसौंदर्याने रावणाच्या मनोवृत्ती धुंद-तरल झाल्या होत्या. त्या शीतल चंद्रप्रकाशात फुलांचा सुगंध घेऊन वाहणाऱ्या मंद सुखद वाऱ्याने रावण बेभान झाला. तेवढ्यात सौंदर्यवती अप्सरा रंभा वस्त्रालंकरांनी आभूषित होऊन, श्रृंगार करुन प्रियकराच्या भेटीसाठी निघालेली रावणाने पाहिली. रंभेची वाट अडवून रावण म्हणाला, "हे कामविलासिनी, तू कुठे निघाली आहेस? या शीतल शीळेवर थोडा विसावा घे. माझा स्वीकार कर." रावणाचा हेतू लक्षात येताच, रंभेने जोराचा प्रतिकार चालवला. ती हात जोडून विनवणीपूर्वक म्हणाली, "माझ्यावर कृपा करा. तुम्ही माझे गुरु व पितृतुल्य आहात."

"हे राक्षसशिरोमणी, धर्मानं मी तुमची पुत्रवधू आहे. कारण तुमचे वडील बंधू कुबेर यांचे पुत्र नलकुवर माझे प्रियकर व नियोजित पती आहेत. मी त्यांच्याच भेटीसाठी एवढ्या ओढीने संकेतस्थळी निघाले आहे. हा माझा सारा साजशृंगार त्यांच्यासाठीच आहे."

परंतु रावणाने जुमानले नाही. रंभेचे निवेदन धुडकावून देत रावण उत्तरला, "तुमच्या देवलोकीचे सारे नियम वेगळे आहेत. अप्सरांना कुणी पती नसतो. तिथे कुणी एका स्त्रीशी विवाह करुन निष्ठापूर्वक राहत नाही." राक्षस रावणाने मग बलपूर्वक रंभेला एका शिळेवर बसवले. त्यात रंभेच्या गळ्यातला पुष्पहार तुटून पडला. आभूषणे अस्ताव्यस्त झाली. रंभा धावतच नलकुवरापाशी गेली. रावणाने आपल्यावर केलेल्या अत्याचाराची सारी हकीकत तिने त्याला कथन केली. त्यावर कुबेरपुत्र नलकुवर

अतिशय संतापला. ध्यान लावून त्याने रावणाच्या कुकर्माची खात्री करुन घेतली व मग हातात जल घेऊन त्याने रावणाला घोर शाप दिला. तो म्हणाला, “भद्रे, तुझी इच्छा नसतानाही रावणानं तुझ्यावर बलपूर्वक अत्याचार केला आहे. यापुढे रावणाने जर कुणा स्त्रीचा तिच्या इच्छेविरुध्द भोग घेण्याचा प्रयत्न केला, तर तात्काळ त्याच्या मस्तकाचे सात तुकडे होतील!”

या शापाने रावण मनोमन धास्तावला व मनाविरुध्द बळजबरीने उचलून आणलेल्या अनेक स्त्रियांना त्याने आपल्या अंत:पुरातल्या बंदिशाळेतून सोडून दिले.

उन्मत्त युध्दपिपासू रावणाने मग थेट इंद्रलोकावर आक्रमण केले. ब्रह्मदेवाच्या वरदानाने रावण आपल्याला आवरणार नाही, याची मनोमन कल्पना इंद्राला होती. त्यामुळे असहाय्य इंद्र विष्णूला शरण गेला. त्यावर दिलासा देत विष्णू उद्‌गारले, “देवराज, घाबरु नकोस. योग्य वेळ येताच मी या रावणाचा त्याच्या सर्व सेनेसह नि:पात करीन, परंतु आज घटकेला तुला आल्या प्रसंगाला कुठल्याही परिस्थितीत सामोरे गेले पाहिजे. तू रावणासह त्याच्या सेनेशी युध्द कर. मागे हटू नकोस.”

मग देवदानवांच्या तुंबळ युध्दाला सुरुवात झाली. व्यक्तिश: रावणाचे या युध्दात फारसे नुकसान झाले नाही, परंतु सर्प जुंपलेला रथ घेऊन सुमाली जेव्हा रणात उतरला तेव्हा वसूने त्याचा रथ तोडून टाकला. सर्पांना सैरावैरा पळणे भाग पाडले. रथ नष्ट झाल्याने एकाकी पडलेल्या सुमालीच्या मस्तकावर वसूने गदेचा प्रहार केला व छिन्नविछिन्न होऊन सुमाली समरांगणात गतप्राण झाला.

वसूने सुमालीचे शरीर भस्म करुन टाकले आणि राक्षस सेनेत एकच पळापळ सुरु झाली. तेव्हा रावणपुत्र मेघनाद मोठ्या उमेदीने रणात उतरला. रथात आरुढ होऊन आलेल्या इंद्रपुत्र जयंताने मेघनादवर हल्ला चढवला. या घनघोर संग्रामप्रसंगी, आपल्याला प्राप्त झालेल्या अद्‌भूत शक्तिचा वापर करुन मेघनादाने सर्वत्र एकदम अंधार पसरवला. त्यामुळे युध्द करणारी देवसेना व राक्षससेना यांच्यात मोठा गोंधळ उडाला. त्या गडबडीत मेघनादाने जखमी घायाळ केलेल्या जयंताला दैत्यराज पुलोमाने पकडले व समुद्रगर्भात पळवून नेले. जयंत नाहीसा झाल्याची वार्ता कळताच देवसेनेची तारांबळ उडाली व एकच पळापळ सुरु झाली.

❍ क्रमश:

**महान तेच होतात, जे महान गुरुंचे, अवतारांचे आदेश आपल्या जीवनात धारण करतात. अशा महापुरुषांच्या महानतेचे केवळ वर्णन करुन कोणी महान बनणार नाही. ते महापुरुष महान तर होतेच. त्यांची महिमा जास्त गाण्यामुळे ते जास्त महान; कमी महिमा गाण्यामुळे कमी महान होणार नाहीत. आपल्याला त्याच्या आदेशावर चालून स्वत: महान बनले पाहिजे.**

**- बाबा हरदेवसिंहजी महाराज**



कथा

# मिशन कचरामुक्ती

सोसायटीच्या बाहेर कचऱ्याचा ढीग साठला होता. दोन दिवस झाले सफाई कामगारांनी कचरा उचलला नाही. प्रत्येक जण सफाई कामगारांच्या नावाने दोष देत होते. राहुल, सुनील, निकिता, सेजल शाळेतून येताना नाक मुठीत धरुनच आले. शी! किती घाण वास सुटलाय कचऱ्याचा! सुनील म्हणाला, "मित्रांनो, दोन दिवस सफाई कामगार आले नाही तर आपली बिकट अवस्था झाली; पण ते जर कधीच आले नाही तर?..... " "बापरे! कल्पनाच करवत नाही." सेजल म्हणाली. राहुल शांतपणे म्हणाला, "अरे आपण त्यांना दोष का

द्यायचा ? कचरा आपण करायचा आणि दोषी ते ? खरं तर आपण सारे दोषी आहोत. एकमेकांना दोष देण्यापेक्षा आपण यावर काहीतरी उपाय शोधायला हवा."

मध्यंतरी दोन-तीन दिवस भरपूर पाऊस पडून गेला होता. नेमकं रविवारी त्याने सुट्टी घेतली होती. तशीच मुलांच्या शाळेलाही सुट्टी होती. तितक्यात राहुलच्या आजीने त्याला हाक मारली, "राहुल, लवकर बाहेर ये हे बघ काय आहे ?" राहुल आणि त्याचे मित्र धावतच आले. पाहतात तर काय, पायरीशी वळवळणारं एक काळसर गुलाबी रंगाचं गांडूळ. सगळे जोरात ओरडले, ईईईईई आज्जी हे काय ?

आजी म्हणाली, "ते काही तुझ्या अंगावर उडी मारणार नाही. तो आपला मित्र आहे. थांब मी तुला त्याची गंमत सांगते." राहुल म्हणाला, अगं आजी ते गांडूळ दोन्ही बाजूंनी चालतंय. आजी म्हणाली, "अरे गांडूळाला शेपटी नसतेच. ते कुठेही कसंही वळू शकतं."

"पण हा इतका अशक्त प्राणी तिसऱ्या मजल्यावर आलाच कसा आजी ?" सुनीलने शंका काढली.

आजी म्हणाली, ते काही पायरीवरुन आलं नाही. ते आलंय, आपल्या कुंड्यांमधून. पावसाळ्यात ही गांडूळं बाहेर पडतात. ती मातीतच असतात. त्यांच्या शी-शूपासून अतिशय उपयोगी खत तयार होतं. गांडूळ माती सुपीक बनवतं. आपण गावाला गेलो होतो, तेव्हा काकाने त्याच्या घरचा गांडूळ प्रकल्प दाखवला होता. तो आठवतोय का ? गांडूळाचेही अनेक प्रकार असतात. दर्जेदार खतनिर्मितीसाठी त्यांची जोपासना केली जाते. गांडूळ नैसर्गिक आणि उत्तम खत तयार करत असल्याने तो शेतकऱ्यांचा मित्र असतो.

राहुल आणि मित्रमंडळी म्हणाली, "वा आज्जी किती छान माहिती सांगितलीस तू! म्हणजे हे गांडूळ काही ईईईई किंवा घाण करण्यासारखं नाही. हा तर आपला मित्रच आहे."

त्यावर आजी म्हणाली, "म्हणूनच या गांडूळांना आपण कचऱ्यात फेकून न देता, त्यांच्या जागेवर म्हणजे बागेत किंवा कुंडीतल्या मातीत सोडून यायला हवं."

राहुल, सुनील, निकिता, सेजल यांना आता कचरामुक्तीचा जणू मार्गच सापडला. त्यांनी मिशन कचरामुक्तीसाठी योजना आखायला सुरुवात केली. त्यांनी दोन मोठ्या कुंड्या आणल्या. सोसायटीचा ओला-सुका कचरा वेगळा करुन ओला कचरा एका मोठ्या कुंडीत जमा केला. त्यात माती अंथरुन गांडूळ सोडले. कुंडी भरल्यावर त्यावर मातीचा थर टाकला. दहा-पंधरा दिवसांनी त्याचे खत तयार झाले. त्यांचा हा प्रयोग यशस्वी झाला. सोसायटीत सर्वांना ही गोष्ट समजली. सर्वांनी त्यांना शाबासकी दिली. गांडूळ खत प्रकल्पातून तयार झालेल्या खताच्या विक्रीतून सोसायटीला पैसेही मिळू लागले आणि कचराही कमी होऊ लागला.

# शब्दकोडे

# १६८

❍ पूजा अरोडा (रेवाडी-हरियाणा)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ■ | १ | | ■ | २ | | ३ |
| ४ | | ■ | ५ | | ■ | |
| | ■ | ६ | ■ | | ■ | |
| | ■ | ७ | | | | |
| ८ | ९ | | ■ | | ■ | ■ |
| ■ | | ■ | १० | | | ११ |
| १२ | | १३ | | | ■ | |
| | ■ | | ■ | ■ | १४ | |

## आडवे शब्द

१. जन्म याचा विरुध्दार्थी शब्द

२. जागतिक लोकसंख्या दिन जुलै महिन्याच्या ...... तारखेला साजरा करतात.

४. जो जाणेल भगवंत, तया नाव बोलिजे ........

५. तांबड्या रक्तपेशींच्या निर्मितीसाठी कोणते खनिज उपयोगी ठरते ?

७. सद्‌गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराजांच्या विचारांचे पहिले पुस्तक

८. भारताचा पहिला अंतराळवीर : ........ शर्मा

१०. महाराष्ट्राच्या उपराजधानीचा दर्जा कोणत्या शहराला दिला आहे ?

१२. लोकसभेचे पहिले प्रवक्ता : गणेश वासुदेव .............

१४. हा पक्षी आपले घरटे विणकाम करुन तयार करतो (बया/ किवी)

## उभे शब्द

१. ...... समुद्राच्या पाण्याची घनता सर्वाधिक आहे.

२. चाँदबीबी ही मुस्लीम महिला या ठिकाणी राज्य करत होती. (श्रवणबेळगोळ/ अहमदनगर)

३. क्षेत्रफळानुसार भारतातील सर्वात मोठे राज्य

४. श्रीलंका क्रिकेट टीमच्या एका माजी कर्णधाराचे नाव : कुमार .......

६. परदेश याचा विरुध्दार्थी शब्द

९. प्रसिध्द मराठी लेखक प्रल्हाद ....... अत्रे यांचे टोपण नाव केशवकुमार हे आहे.

१०. ...... दाबले की तोंड उघडते (म्हण)

११. भारतातील पहिली महिला राज्यकर्ती : सुलताना ........

१२. जानेवारी नंतर या महिन्याचे ३१ दिवस असतात.

१३. कुबेराची ही नगरी रावणाने जिंकून घेतली.

उत्तरे इतरत्र

# दादाला विचारु या

**प्रश्न : सेवा का करावी ? सेवेचं फळ काय ?**

**उत्तर :** बऱ्याचदा काहीजण उत्साहाच्या भरात म्हणतात - तनाने सेवा केली की तन मजबूत होईल, धनाने सेवा केली तर भरपूर धन येईल, मनाने सेवा केली, की मन प्रसन्न राहील. अर्थात हे जरी खरं असलं तरी सेवा या कारणासाठी मुळीच करायची नसते. या गोष्टी मनात ठेवून सेवा केली तर ती सेवा न होता सौदेबाजी होईल. निष्काम भावनेने होते, ती खरी सेवा. सेवेचं फळ काय असं विचारलं तर त्याचं उत्तर एकच - अलौकिक आनंद. काहीजणांना वाटतं, की भरपूर धनसंपत्ती असेल तर जीवन आनंददायी होईल; पण नाही. जे धन सेवेत लावलं जात नाही ते धन कदापि आनंद देऊ शकत नाही. जे तन धडधाकट असूनही सेवेत लावलं जात नाही ते तन कधीच उत्साही, निरोगी राहत नाही. म्हणून ऐषोआरामाने किंवा धनदौलतीने जो आनंद प्राप्त होत नाही तो आनंद केवळ सेवेनेच प्राप्त होतो आणि तोही तात्काळ प्राप्त होतो. सेवादारावर गुरुच्या आशीर्वादाची अमृतवर्षा सदैव होत राहते.


**प्रश्न : ज्ञान होऊनही काही जण दु:खी-कष्टी दिसतात, असे का ?**

**उत्तर :** एखाद्या व्यक्तीला एका ठिकाणी पोहचायचं असेल पण त्याला रस्ता ठाऊक नाही, अशावेळी कुणीतरी सद्गृहस्थ त्याला तिथे पोहचण्याचा मार्ग दाखवतो. मग ती व्यक्ती त्या ठिकाणी पोहचली असे म्हणता येईल का ? अर्थात, मार्गदर्शकाच्या सांगण्यानुसार ती व्यक्ती त्या मार्गाने गेली तर नक्कीच पोचेल. पण त्या व्यक्तीने केवळ ती गोष्ट ऐकून सोडून दिली तर ती व्यक्ती कधीच पोहचू शकणार नाही. अगदी याच पध्दतीने सद्गुरु हा मार्गदर्शक आहे. सद्गुरुने दाखवलेल्या मार्गावर जो चालतो तो कधीच दु:खी कष्टी होणार नाही. पण जो केवळ त्या गोष्टी ऐकून सोडून देईल तो मात्र दु:खी कष्टी दिसतो. कारण ज्ञान म्हणजे माहिती किंवा जाणकारी नव्हे; तर ज्ञान म्हणजे जीवन जगण्याची पध्दती आहे. ज्ञान आचरणात आणण्यासाठी असते.

**प्रश्न : परमात्म्याचे यथार्थ स्मरण कोणते ?**

**उत्तर :** परमात्म्याशी नाते जोडल्यानेच जीवनाला विशेषता प्राप्त होते. परमात्मा सदैव जवळ आहे त्याला शोधण्यासाठी कुठेही दूर जावे लागत नाही. अशा प्रभुला जवळ पाहून आणि याच्याशी प्रेम करुन याच्याशी नाते जोडायचे आहे आणि अशी दृष्टी प्राप्त करायची आहे, की हा प्रभू सर्वत्र आहे. हेच परमात्म्याचे यथार्थ स्मरण होय.

❑❑❑



# ज्ञानामुळे सकारात्मक बदल

ज्ञानानंतर जीवनात बदल घडून येतो. आपल्या जीवनात भक्तिभाव आला, की जीवन आनंददायी होतं. जगाचं रुप देखील सुंदर बनतं. अर्थात भक्तिमय वातावरण तेव्हाच स्थापित होऊ शकतं, जेव्हा या निराकार-प्रभू-परमात्म्याचं दर्शन होतं.

आज कुणाला कुणाची विचारपूस करायला सवड नाही. पाच मिनिटं थांबून सुहास्य वदनाने कुणाशी बोलायला वेळ नाही. प्रत्येकाला स्वत:चीच चिंता आहे. प्रत्येकजण चिंताग्रस्त आहे. याचं काय कारण असावं ? एखादी व्यक्ती आजारी पडली, की डॉक्टरकडे जाते. डॉक्टर

त्याची तपासणी करुन रोगाचं मूळ शोधून काढतात आणि ते दूर करण्यासाठी काही औषधं आणि पथ्यपाणी सांगतात. त्यामुळे रोगी ठीक होऊन पुन्हा आनंदाने जीवन जगू लागतो. तसं, माणसाच्या या अशा वागण्याचं मूळ कारण आहे, की तो प्रभु-परमात्म्यापासून दूर जाऊ लागला आहे. संत-महापुरुषांना तर सगळेच मानतात; पण त्यांनी सांगितलेलं मानत नाहीत. जसं आपण, डॉक्टरांना मानतो, डॉक्टरांचंही मानतो तेव्हाच रोगमुक्त होतो. तसं संतांचंही मानायला हवं, या प्रभु-परमात्म्याची ओळख करुन याच्याशी नातं जोडायला हवं. तेव्हाच अज्ञान-अभिमानरुपी रोगाचा नायनाट होऊन मनुष्य सद्‌गुणांनी युक्त होईल. आनंदाने व खेळीमेळीने जीवन जगू लागेल. एकमेकांचा दु:स्वास न करता एकमेकांच्या उपयोगी पडेल. यासाठी ज्ञान घेणं गरजेचं आहे. ज्ञान म्हणजे केवळ माहिती किंवा जाणकारी नाही. बाबाजींनी ३६ वर्षे दिवस-रात्र एक करुन जी शिकवण दिली ती आम्हाला जीवनात उतरवायची आहे.

एकदा सत्संगात एका महापुरुषाकडून ऐकायला मिळालं, की ते एकदा प्रचाराला गेले होते. तेथे त्यांनी ज्ञान घेण्याची प्रेरणा दिली. त्यावेळी मध्येच एक गृहस्थ उठून म्हणाले, "आपण जर नाक्यावरच्या लालाजींना दिलेलं ज्ञान देणार असाल तर आम्ही अवश्य घेऊ." कुणीतरी विचारलं, हे लालाजीवालं ज्ञान काय आहे ? त्यावर ते गृहस्थ म्हणाले, "लालाजी खूप भांडखोर होते. प्रत्येकाशी भांडण-तंटा करायचे. प्रामाणिकपणे वागत नसत. अचानक एकदा ते निरंकारी संत समागमाला गेले आणि जेव्हा ते परत आले तेव्हा त्यांच्यात अमूलाग्र बदल झालेला आढळला. कुणाशी भांडण-तंटा करणे तर दूरच उलट स्वत:ची चूक नसतानाही माफी मागत. प्रत्येकाशी प्रेम-नम्रतेने वागू लागले. आपला धंदा इमाने -इतबारे करु लागले. तसं बदल घडवणारं ज्ञान आम्हाला पाहिजे."

अशा तऱ्हेने ज्ञानामुळे जीवनात सकारात्मक बदल घडून येतो. प्रत्येकात सद्‌गुणांचा सुगंध दरवळू लागतो. रस्त्याने जाताना आपण पाहतो, दुतर्फा उभी असलेली झाडं पाना-फुलांनी बहरलेली असतील तर किती सुंदर दिसतात. दातार कृपा करो सर्वांचं जीवनही तसंच सुंदर आणि सुगंधी बनो.

❒❒❒

निराकार सर्व ऊर्जांचा स्त्रोत आहे. हा नेहमी ऊर्जेने भरलेला असतो. हा पाण्याच्या नळाप्रमाणे आहे. तुम्ही पाहिजे तितके ऊर्जारुपी पाणी याच्यातून प्राप्त करु शकता. हा रिकामा नाही. तुम्ही यातून कितीही ऊर्जा घ्या. या निराकाराला काहीच फरक पडत नाही. हा सदैव भरलेलाच आहे.

- बाबा हरदेवसिंहजी महाराज



कथा

# पारख

राजा विक्रमादित्याच्या दरबारात अनेक गुणी माणसं होती. विद्वान होते, पंडित होते. अनेक विद्येत पारंगत असलेले मातब्बर मोठ-मोठे मंत्री होते. परंतु एके दिवशी मात्र राजाची प्रतिष्ठा पणाला लावणारी घटना घडली.

राजाचा दरबार भरला होता. थंडीचे दिवस होते. त्यामुळे दरबारही कोवळ्या उन्हात भरलेला. त्या गर्दीत सर्व प्रकारची प्रजा होती. तितक्यातच जयराज नावाची एक व्यक्ती पुढे आली. म्हणाली, माझ्याकडे एकसारख्या दोन वस्तू आहेत. त्या वस्तूंमधील फरक ओळखण्याची स्पर्धा मी घेतो. आत्तापर्यंत अनेक राजांना हरवून मी इथपर्यंत आलोय. ही स्पर्धा या दरबारात घेऊ का... ?

उत्सुकतेपोटी राजानं ती स्पर्धा घ्यायला मान्यता दिली. सिंहासनासमोरच एक आसन ठेवण्यात आलं. त्यावर दोन वस्तू ठेवण्यात

गेल्या. दोन्ही वस्तू अगदी एकसारख्याच, रंग, रुप, वजन, आकार अगदी तंतोतंत. त्यात फरक नाहीच. त्या व्यक्तीनं सांगितलं, की दोन्ही वस्तू दिसायला एकसारख्याच आहेत. पण त्या दोन्हींमध्ये खूपच फरक आहे. यापैकी एक आहे हिरा आणि दुसरी आहे काचेचा तुकडा. पण आत्तापर्यंत कोणीही याची पारख करु शकलेला नाही.

जर कोणी याची पारख केली; तर हा हिरा मी राज्याच्या तिजोरीत देऊन टाकणार. नाहीतर हिऱ्याची जी किंमत आहे, ती तुम्ही मला द्यायची. ही स्पर्धा आत्तापर्यंत अनेक राज्यांमध्ये जिंकूनच मी आपल्याकडे आलो आहे.

राजा म्हणाला, मी तर नाही पारखू शकणार. मग दरबारातल्या मंडळींना विचारले, दोन्ही वस्तू दिसायला सारख्या आहेत, की कोणालाच नाही ओळखता येणार. इतकं धाडस कोण करणार ? हाच खरा प्रश्न होता. हिऱ्याची किंमत द्यायला हरकत नव्हती. कारण, राजाकडे तेवढी संपत्ती नक्कीच होती. त्यामुळे, जिंकणार नाही याची खात्री दरबारातल्या लोकांना होतीच. प्रश्न होता तो राजाच्या प्रतिष्ठेचा. ती प्रतिष्ठा कमी होऊ नये, अशी सगळ्यांची इच्छा होती. सगळ्यांनीच नकार सांगितला. पण तेवढ्यात कुजबूज सुरु झाली. सोमदेव नावाची एक अंध व्यक्ती पुढे येऊन म्हणाली, महाराज, मी प्रयत्न करु का...? राजालाही आश्चर्य वाटलं. एक मंत्री म्हणाला, आम्हाला डोळे असून या दोन्ही गोष्टींमधला फरक नाही कळत. तुम्ही काय सांगणार ? त्यावर सोमदेव म्हणाला, "पारख नाही केली तर तशीही तुम्हाला त्या हिऱ्याची किंमत द्यावीच लागणार आहे. एक प्रयत्न करुन बघतो." राजानं होकार दिला.

सोमदेव आसनाजवळ आला. त्या दोन्ही वस्तू त्यानं हातात घेतल्या. क्षणार्धात त्यानं एक हात पुढे करुन सांगितलं, की हा काचेचा तुकडा आहे. ही स्पर्धा ज्यानं लावली होती, तोही पुढे आला. त्यानं पाहिलं. तोही म्हणाला बरोबर आहे महाराज. हाच काचेचा तुकडा आहे. मी हरलो. आता हा हिरा तुमच्या खजिन्यात जमा करुन टाका. पण मला प्रश्न पडला आहे, की अंध सोमदेवने हा फरक ओळखला कसा ?

त्यावर सोमदेव म्हणाला, "अगदी सोपं आहे महाराज. आपण सगळेजण उन्हात बसलो आहोत. या दोन्ही गोष्टी हातात घेतल्या. त्यांचा स्पर्श झाला. जी वस्तू थंड होती ती हिरा आणि जी गरम झालेली वस्तू होती ती म्हणजे काचेचा तुकडा." राजा खूश झाला. त्यानं त्या अंध व्यक्तीला मोठ्ठे बक्षीस दिले. त्यावर जयराज पुढे येत म्हणाला, "महाराज, अनेकदा माणसांची पारख करण्यात आपलीही चूक होते. उन्हात असूनही हिरा गरम होत नाही. हिऱ्यासारखा दिसणारा काचेचा तुकडा मात्र चटकन गरम होतो. तशी गुणवान दिसणारी एखादी व्यक्ती जेव्हा अभिमानात येते तेव्हा चटकन तिचा तोल सुटतो. पण कितीही संकटं आली, तरीही जो डगमगत नाही किंवा आपल्या बुध्दिमत्तेचा अहंकार करत नाही तोच खरा हिरा. आज तुम्ही सुध्दा पारख करायला चुकलात." राजाने आपली चूक मान्य करत अभिमानी मंत्र्याला काढून त्या जागी त्या अंध सोमदेवाची नेमणूक केली.

❑❑❑



# आजोबा

*चित्रांकन : दीपक मेहरा (दिल्ली)*

*चित्रांकन -रंग : अजय कालडा*





आई ! किती किलो सफरचंद आणू ?
तीन किलो !
हे घे पैसे आणि बघ गोड सफरचंद घेऊन ये. खाऊन बघ पहिल्यांदा.
हो आई ! मी चव घेऊनच आणीन.
आता हा फळवाला कुठे भेटेल ?


अरे व्वा ! तो तेथे फळवाला आहे.
फळवाले काका, सफरचंद कसे दिले ?
शंभर रुपये !
मला तीन किलो सफरचंद द्या. पण हे बघा सफरचंद गोड असले पाहिजेत.
एकदम गोड आहेत बाळ. अगदी मिठाईसारखे.
आईने सांगितले आहे, की फळं खाऊन बघून आण.
हो ! हो ! घे खाऊन बघ.


हो. ठीक आहे.
मी प्रत्येक सफरचंद खाऊन बघणार. आईने तसंच सांगितलं आहे.
अरे, हे सगळे सफरचंद खाल्लेले आहेत. हे तू काय उचलून आणलंस ?
आई ! तूच तर सांगितलं होतंस ना, की प्रत्येक सफरचंद खाऊन बघ म्हणून.
शेखचिल्ली, म्हणून तर तुला सर्वजण मूर्ख म्हणतात. थोडं तरी समजूतदार बन.
हो आई, सगळे सफरचंद खराब झाले. मी समजलो हे सर्व सफरचंद फेकून दिले पाहिजेत. आपल्याला प्रत्येक काम विचारपूर्वक केलं पाहिजे.

# तालयोगिनी सावनी तळवलकर

सावनी तळवलकर तालयोगी पं. सुरेश तळवलकर आणि जयपूर अत्रौली घराण्याच्या गायिका पद्मा तळवलकर यांची कन्या. घराण्याचा वारसा तबल्यासारख्या वाद्याच्या माध्यमातून त्या पुढे चालवित आहेत. हे माध्यम समर्थपणे हाताळणाऱ्या मुलींची संख्या तशी तुलनेने मोजकीच आहे पण सावनीने जाणीवपूर्वक हे माध्यम निवडले असून तिच्या घरच्यांनीही तिला नेहमीच प्रोत्साहन दिले आहे. वयाच्या तिसऱ्या वर्षापासून तबल्यावर थाप मारणारी आणि तालाचे उपजतच ज्ञान असणारी सावनी आता एक स्वतंत्र तबला आर्टिस्ट म्हणून नावारुपाला येत आहे. आयुष्याच्या सुरुवातीच्या टप्प्यावरच पुरस्काराची मोहर उमटल्यामुळे प्रोत्साहन तर आपसुकच मिळणार आहे, पण त्याचबरोबर या महाराष्ट्रकन्येचे नाव राष्ट्रीय पातळीवर पोहोचणार आहे. वडिलांना अनेक कार्यक्रमांमधून तबल्याची साथ करणाऱ्या सावनीची आता मोठ्या रंगमंचावर स्वतंत्रपणे पाऊले पडू लागली आहे. वडील आणि गुरु. पं. सुरेश तळवलकरांच्या या शिष्येने त्यांच्या मार्गदर्शनाखाली तालाचे अनेक प्रकार आत्मसात केले आहेत. 'स्वर तालयात्रा', 'शिव तालयात्रा' यांसारख्या पं. तळवलकरांनी आखलेल्या उपक्रमांमधूनही सावनीने आपली कला अनेकांसमोर मांडली आहे. आजोबा दत्तात्रय तळवलकर यांच्या अमृतमहोत्सवी समारंभात सावीनीने पहिल्यांदा आपल्या तबलावादनाची झलक उपस्थितांना दाखवली होती तेव्हा तिचं वय होतं अवघं पाच वर्ष. पण तो छोटी झलक भविष्यातील तिच्या उज्ज्वल कारकीर्दीची साक्ष देणारी ठरली. २००६ मध्ये पं. पंढरीनाथ नागेशकर गुरुजी आणि ग्वाल्हेर घराण्याचे ज्येष्ठ गायज पं. उल्हास कशेळकर यांच्यासमोर सावनीला आपली कला सादर करण्याची संधी मिळाली. २००७ मध्ये शारदा संगीत विद्यालयात तिचा तबलावादनाचा सोलो कार्यक्रम यशस्वी झाला. सावनीने अनेक दिग्गज कलाकारांसमोर आपली कला सादर केली आणि अनेकांच्या शाबासकीची थाप तिच्या पाठीवर पडली. त्यानंतर पूर्णावाद महोत्सव, गंधर्व महाविद्यालयाचा संगीत महोत्सव अशा एकामागून एक कार्यक्रमातून सावनी आपल्या कलेची छाप पाडत गेली. मुंबई, पुणे, नाशिक, सातारा, कोल्हापूर, पेण, अहमदनगर, पंढरपूर इत्यादी महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी कार्यक्रम यशस्वी केल्यानंतर बंगळुरु, दिल्ली आणि त्यानंतर थेट थायलंड, अमेरिकेपर्यंत वेगवेगळ्या रंगमंचावर सावनीने आपली कला सादर केली. युवा पुरस्काराच्या निमित्ताने सावनीची कला दूरदूरपर्यंत पोहोचणार आहे.

कविता : सुरेश तिर्लोटकर

# बळीराजा आनंदीत झाला

आला आला पाऊस आला
बळीराजा आनंदीत झाला ।।ध्रु।।



बैलजोडी घेऊन खिल्लारी
औजार घेऊनी खांद्यावरी
डौलात चालले शेतावरी
औत जुंपूनी शेत नांगरी
तहान भूक न त्याला ।।१।।

रोप रुजुनी वरती आले
लावणीस ते तयार झाले
महिलां संगे आली मुले
रोप लावणी लावू लागले
थकवा नाही कुणाला ।।२।।





जिकडे तिकडे पाणीच पाणी
झरे वाहती डोंगरावरुनी
त्यात धावते कोकण राणी
रम्य निसर्ग पाहून नयनी
सीमा ना आनंदाला ।।३।।

धरती माता हर्षीत झाली
हिरवी साडी जणू नेसली
लाल किनारी कुमकुम भाळी
सिध्द अशी ही मायमाऊली
सुखविण्या जगताला ।।४।।







# किल्ले कोर्लई

जलदुर्ग प्रकारातील २७१ फूट उंचीचा हा किल्ला आहे. रायगड जिल्ह्यातील अलिबाग डोंगररांगेतील हा किल्ला ट्रेकर्सच्या दृष्टीने मध्यम समजला जातो. अलिबाग हे एक प्रसिध्द ठिकाण. इथला समुद्रकिनारा आणि कुलाबा किल्ला हे सगळेच पाहतात. इथून दक्षिणेस म्हणजे मुरुड-जंजिराच्या दिशेने निघालो, की १५-२० कि.मी. वर रेवदंड्याचा कोट आणि पुढे ३-४ कि.मी. वर कोर्लईचा किल्ला वसलेला आहे. रेवदंड्यापर्यंत बसने जाता येते. इथून कुंडलिकेच्या खाडीवरचा पूल पार करुन आपण कोर्लईच्या पायथ्याशी असलेल्या कोळीवाड्यात पोचतो. हा किल्ला थोडा वेगळाच आहे. कारण हा स्थित आहे कुंडलिका खाडीच्या मुखाशी. म्हणूनच याला पंडित महादेवशास्त्री जोशींनी कुंडलिकेने सिंधुसागराला आलिंगण दिले, त्या प्रीतिसंगमावरचा हा तीर्थोपाध्यायच आहे असे म्हणून जणू गौरविलेच आहे. यास तिन्ही बाजूंनी सागराने वेढा घातला आहे.

## इतिहास :

हा किल्ला १५२१ मध्ये दियोगु लोपिश दि सिकैर या पोर्तुगीज गव्हर्नरने निजामशहाकडे रेवदांड्याजवळच्या चौलच्या खडकावर धक्का आणि क्रुसाची बातेरी बांधण्याची परवानगी मागितली आणि ते बांधले. रेवदंडा हे पोर्तुगीजांच्या मुख्य ठाण्यांपैकी एक. इथे एक मजबूत कोट आहे. १५९४ साली पहिला बुऱ्हाण निजाम गेल्यावर निर्माण झालेल्या अस्थिरतेचा फायदा उचलून फिरंग्यांनी चौलच्या खडकावर तटबंदी बांधण्याचा प्रयत्न केला. हुसेन निजामाने यास नकार दर्शवला आणि

स्वत:च एक बळकट दुर्ग उभारण्याचे ठरवले. एका संघर्षात दोघांनी पड खाल्ली आणि तह झाला. ठरले असे, की निजामाने किल्ला बांधू नये आणि पोर्तुगीजांनी काहीही सागरी उपद्रव देऊ नये. पण दुसऱ्या बुऱ्हाण निजामाने मात्र पोर्तुगीजांना न जुमानता इथे पक्का किल्ला बांधला. एकदा फत्तेखान या सरदाराने रेवदांड्यावर तोफा झाडल्या आणि पोर्तुगीजांना शह देण्याचा प्रयत्न केला. पोर्तुगीजांना कुमक अपुरी पडली म्हणून त्यांनी आणखी कुमक मागवली आणि प्रत्युत्तर म्हणून कोर्लईवरच हल्ला केला. पोर्तुगीज गडाखालच्या पेठेत घुसले आणि त्यांनी निजामाचा एक हत्ती मारला. शेवटी त्यांनी गड घेतला. मात्र गड घेतल्यावर त्यांना कडक बंदोबस्त करावा लागला. एका उल्लेखानुसार इथे १६०२ साली ८००० शिरेबंदी होती. एवढ्या साऱ्या व्यापामुळे त्यांनी बालेकिल्ला ठेवून बरेचसे बांधकाम पाडले. १६८३ मध्ये संभाजी महाराजांनी कोर्लई घेण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. १७३९ साली चिमाजी अप्पाने सुभानराव मानकरांना कोर्लईवर पाठवले आणि वर्षभरातच किल्ला हाती लागला. मराठ्यांनी बुरुजांची नावे बदलून दियागोचे नाव पुस्ती बुरुज आणि फ्रांसिसकुचे नाव ठेवले गणेश बुरुज.

## गडावरील पाहण्यासारखी ठिकाणे

इथल्या प्रवेशद्वारातून आत गेल्यावर आपण फक्त १० मी. रुंद अशा जागेवर फिरतो. हा बालेकिल्ला. इथून दर्शन होते ते एका विहंगम दृश्याचे. एका बाजूला निळ्याशार सागरावर छोट्या-छोट्या होड्या दिसतात तर एकीकडे आपण खाडी आणि सागर यांची भेट झालेली पाहतो. इथे एक उत्तराभिमुख चर्चचे अवशेष आहेत. आता आपण उत्तरेकडे वळतो. सर्वप्रथम आपल्याला दोन बुरुजांनी संरक्षित असलेल्या दरवाज्यातून आत जावे लागते. इथे काही अवशेष आपल्याला आढळतात. मुख्य बालेकिल्ल्याच्या खाली पश्चिमेकडे तटबंदीजवळ दारुचे कोठार आहे. पश्चिम आणि उत्तर तटबंदीला तोफा स्थानापन्न केल्या होत्या. आता जरा उत्तरेला वळलो, की आपण इथल्या माचीवर पोहोचतो. यास क्रुसाची बातेरी किंवा सांताक्रुज म्हणतात. ही अंदाजे तीन मी. लांब माची आहे. थोडक्यात हा पोर्तुगीज धाटणीचा किल्ला आपल्याला सहजच त्याच्या सौंदर्यात रममाण होण्यास भाग पाडतो.

## गडावर जाण्याच्या वाटा

सर्वप्रथम आपल्याला रेवदांड्याला पोहोचावे लागते. इथे राज्य परिवहन महामंडळाची सेवा उपलब्ध आहे. इथून कोर्लई गावात आपण रिक्षाने २० मिनिटांत गडाच्या पायथ्याशी पोहोचतो. अथवा मुरुड-जंजिराला जाणारी बस आपल्याला गावाच्या वेशीवर सोडते. गडाच्या पायथ्याशी एक सुंदर समुद्रकिनारा आहे. गडावर आपण दोन वाटांद्वारे पोहोचू शकतो. एक आहे समुद्रकिनाऱ्यावरुन. इथून पायऱ्या चढून आपण ४० मिनिटांत कोर्लईच्या गडमाथ्यावर पोहोचतो.

किल्ल्यावर राहण्याची सोय नाही. गावात होऊ शकते. जेवणाची सोय आपण स्वत: करावी लागते. किल्ल्यावर पिण्याचे पाणी उपलब्ध नाही. ❑❑❑


# आरोग्याबाबत थोडेसे

- पहाटे सूर्य उगवण्याच्या दीड तास आधी उठावे.
- सकाळी उठून थोडे हलके गरम पाणी प्यावे.
- पिण्याचे पाणी घोट-घोट व खाली बसून प्यावे.
- सकाळी पोट भरुन जेवण करावे.
- सूर्य उगवल्यानंतर पुढील अडीच तासापर्यंत सकाळचा नाश्ता करावा.
- सकाळच्या जेवणासोबत नेहमी ज्यूस प्यावे.
- दुपारच्या जेवणासोबत लस्सी किंवा ताक प्यावे.
- रात्रीच्या जेवणासोबत नेहमी दूध प्यावे.
- रात्रीच्या वेळी आंबट फळे खाऊ नयेत.
- आईस्क्रीम कधीही खाऊ नये.
- फ्रिजमधून काढलेले पदार्थ १ तासानंतर खावेत.
- शीतपेये अजिबात पिऊ नयेत.
- तयार झालेले जेवण ४० मिनिटात खावे.
- दुपारचे जेवण पूर्ण जेवू नये थोडी भूक असू द्यावी.
- रात्रीचे जेवण सूर्य मावळण्याआधी करावे.
- जेवण करण्याच्या ४८ मिनिटे अगोदर पाणी प्यावे.
- सकाळी जेवण केल्यानंतर काम करावे.
- दुपारच्या जेवणानंतर थोडी विश्रांती करावी.
- रात्रीच्या जेवणानंतर किमान ५०० मीटरचा तरी एक फेरफटका मारावा.
- जेवण केल्यानंतर नेहमी वज्रासन करावे.
- रात्री ९-१० वाजेपर्यंत झोपावे.
- जेवण कधीही पोट भरुन करु नये. थोडी भूक नेहमी ठेवावी.
- रात्री सलाड खाऊ नयेत.
- जेवण नेहमी जमिनीवर बसून व व्यवस्थित चावून खावे.
- चहा पिणे सहसा टाळावे.
- दुधात नेहमी हळद टाकून प्यावे.
- आयुर्वेद चिकित्सा पध्दती आरोग्यासाठी चांगली आहे.

❑❑❑

# आसन : सुप्तभद्रासन

या आसनाला सुप्तगोरक्षासन देखील म्हणतात. या आसनस्थितीत जप, प्राणायाम, ध्यान इत्यादी सहजगत्या करता येते. या आसनांचे दोन प्रकार आहेत.



**कृती १ (प्रकार पहिला) :-** उजवा पाय गुडघ्यात वाकवून त्या पायाची टाच जननेंद्रिय व गुद्वाराच्या मध्ये असणाऱ्या शिवणीच्या उजव्या भागात, तसेच डावा पाय गुडघ्यात वाकवून त्या पायाची टाच शिवणीच्या डाव्या भागात अशा प्रकारे ठेवा, की दोन्ही पायांचे चवडे एकमेकांना चिकटून राहतील. त्यानंतर पाठीवर सरळ झोपा. आता चित्रात दाखविल्याप्रमाणे दोन्ही पायांच्या टाचा शिवणीच्या भागापासून दूर ठेवा. पायांचे चवडे मात्र एकमेकांना चिकटून ठेवा. दोन्ही हातांचे पंजे दोन्ही पायांच्या मांड्यांवर अशाप्रकारे दाबून ठेवा, की दोन्ही हात सरळ राहिले पाहिजेत. सुरुवातीस काही दिवस हे आसन ३० सेकंदांपर्यंत करावे. त्यानंतर हळूहळू वेळ वाढवित १५ मिनिटांपर्यंत हे आसन करता येते.

**कृती २ (प्रकार दुसरा) :-** प्रथम सुप्तभद्रासनाचा पहिला प्रकार करावा. नंतर दोन्ही हातांची बोटे एकमेकांत गुंफून बंद करा. त्यानंतर मस्तक, मान आणि खांद्याचा भाग वर उचला. एकमेकांत गुंफलेल्या बोटांत एकमेकाला चिकटलेल्या पायांचे पंजे घेऊन अशाप्रकारे खेचा, की टाचांनी त्या त्या पायाच्या मांड्या दाबल्या जातील. आता दोन्हीही हात सरळ करुन शरीर सैल सोडा. ज्यांना बध्दहस्त पद्मासन करणे कठीण वाटत असेल, त्यांनी या आसनाचा नियमित सराव करावा. सुरुवातीला काही दिवस ३० सेकंदांपर्यंत हे आसन करावे. नंतर हळूहळू वेळ वाढवित ३ मिनिटांपर्यंत हे आसन करावे.

## फायदे :

- हे आसन केल्याने रक्ताभिसरणाची क्रिया चांगल्याप्रकारे होते. परिणामत: अंत:स्त्रावी ग्रंथीमध्ये साचलेला रस शरीराच्या सर्व भागात पसरतो.
- या आसनाच्या सरावाने हृदय स्फुरण पावते आणि ते सुदृढ बनते. त्यामुळे हे आसन करणाऱ्या व्यक्तींनी अधिक श्रम केले तरी त्यांच्या हृदयाचे स्पंदन एकदम वाढत नाही.
- या आसनात पाठीचा कणा सरळ राहत असल्याने जप, प्राणायाम व ध्यान सहजगत्या करता येते.

❐❐❐

# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा


दिपीका गावडे


प्रज्ञा कुळचे


नमीश जामखंडे


समृध्दी कदम


गार्गी सुतार


स्पृहा मुळे


विवान घाग


शुभनीत साळुंके


अवनीत


निधी गोरे


अथर्व ढाले


दिपेश शिंदे


सुप्रिया शाह


आर्वी खेरडे


निर्गुण धारवे


रेणूका शाह


रिध्दी नागटिळक


आरूष घोरपडे

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा















# वैज्ञानिक प्रश्नोत्तरे

प्रश्न : आकाशात विजा चमकत असताना झाडाखाली उभे राहणे का धोक्याचे आहे ?

उत्तर : आकाशात जेव्हा विजा चमकतात त्यावेळी विद्युतभारीत मोठमोठे ढग इकडेतिकडे फिरत असतात. जेव्हा त्यांच्यावर जमा झालेला विद्युतभार खूप वाढतो तेव्हा तो प्रभार दुसऱ्यांना देण्यासाठी ते ढग जवळच्या वस्तुकडे ओढले जातात. एखाद्या सपाट पटांगणावर उभे असलेले झाड जमिनीपेक्षा त्यांना जवळ असते व विद्युतभारित ढग झाडाच्या शेंड्याकडे ओढले जातात. झाडाच्या ओल्या खोडातून ढगावरील विद्युतप्रभार जमिनीत जोराने निघून जातो. ही घटना क्षणात घडते पण प्रभार मोठा असल्यामुळे तो ओल्या खोडातून वाहताना खूप उष्णता तयार होते व त्या उष्णतेने खोडातील पाण्याची वाफ होते. ही वाफ खोडाला फोडून जोराने बाहेर निघते व झाड नष्ट होते. ही क्रिया घडत असताना झाडाखाली एखादी व्यक्ती उभी असली तर तिला इजा होऊ शकते.

प्रश्न : अन्नधान्यामध्ये कीड कशी तयार होते ?

उत्तर : धान्य दीर्घकाळ साठविल्यास अनेक दाण्यांना भोके पडलेली दिसतात. त्यात पोरकिडे बारीक तपकिरी रंगाचे, लांबट तोंड असलेले सोंडे अथवा बारीक अळ्या आणि जाळीचे पुंजके दिसतात. या सर्व धान्य खाणाऱ्या कीटकाच्या प्रजाती असतात. हे सर्व कीटक धान्यातील पिठूळ पदार्थावरच जगतात व वाढतात. धान्यातील पिठूळ पदार्थ पोखरण्यासाठी दाण्यांना भोके पाडून आत शिरुन पिठूळ पदार्थ फस्त करतात. आपण जेव्हा धान्य विकत घेतो तेव्हाच धान्यासोबत वरील कीटक अथवा त्यांच्या जीवनचक्रातील अंडी, अळ्या इ. अवस्थामध्ये अगदी शेतकऱ्याच्या खळ्यावरुन, गोदामातून अथवा दुकानातून अल्प प्रमाणात येतात आणि अगदी थोड्या संख्येत आलेल्या या कीटकांचे झपाट्याने प्रजनन होऊन त्यांची संख्या प्रचंड होते. धान्य अगदी कडक वाळलेले नसल्यास तसेच साठवणुकीच्या पात्रात कीटकांना सुलभतेने प्रवेश मिळविता आल्यास कीटकांचे प्रमाण वाढते. यावर उपाय म्हणजे धान्य कडक वाळवूनच साठवणे, साठवणुकीची जागा कोरडी असून हवेशीर ठेवणे; तसेच मानवाला अपायकारक नसलेल्या कीटकनाशकांचा (रासायनिक धूमीकरण, बोरिक पावडर, कडुनिंबाचा पाला) वापर केल्याने धान्याचे संरक्षण होते. गहू, डाळी यांना एरंडीचे तेल लावून ठेवल्याने फायदा होतो.

प्रश्न : अळूच्या पानाची भाजी खाताना घसा का खवखवतो ?

उत्तर : अळूच्या पानात कॅल्शियम ऑक्झॅलेटचे स्फटिक असतात. त्यांचा आकार पाकिटासारखा असतो व त्याची टोके सुईसारखी तीक्ष्ण असतात. भाजी गिळताना हे स्फटिक घशाला आतून घासले जातात व त्यामुळे आपला घसा खवखवतो.

❑❑❑

# बेताज पातशहा - भापाजी

मित्रांनो, बाबा अवतारसिंहजी महाराजांनी स्वत: 'बेताज पातशाह' ही उपमा 'भापा रामचन्दजी' कपूरथलावाले यांना दिली. कारण त्यांचं जीवन सरळ, सहज, निर्मळ आणि दीपस्तंभाप्रमाणे होते. ते महान विद्वान, दूरदर्शी संत, मनोवैज्ञानिक होते. उच्च आचरण आणि नैतिकता, गुरुच्या मायेचा सदुपयोग करणे ते जाणत होते. तसेच एक संत महात्म्याचे जसे जीवन असले पाहिजे तसेच जीवन जगले.

भापा रामचन्दजी एक पूर्ण गुरसिख होते. गुरमताचे बारकावे ते सहज समजावत. भापा रामचन्दजी गुरमताचे चालते फिरते विद्यालय होते. त्यांचे जीवन गुरमताच्या आरशाप्रमाणे होते. त्यांच्याकडे बघून अनेकजण जीवनात गुरमत धारण करण्याची शिकवण घेत. त्यांच्या मनात, हृदयात प्रत्येकाविषयी प्रेम, दया, करुणा, सद्‌भाव असे. त्यांचे पावन, सरळ आणि साधे जीवनच एक प्रचाराचे बहुमूल्य स्त्रोत होते. त्यांचे व्यक्तिगत जीवन पाहून ते राहत असलेल्या मोहल्यातील बहुतांश कुटुंबांनी ब्रह्मज्ञान प्राप्त केले.

भापाजींचा सद्‌गुरुवर ठाम विश्वास होता. त्यांना ज्ञात होते, की सद्‌गुरुच निरंकार-प्रभु आहे. म्हणूनच बाबा बुटासिंहजी, बाबा अवतारसिंहजी, बाबा गुरबचनसिंहजी या तिन्ही सद्‌गुरुंमध्ये निरंकार-प्रभुचे रुप पाहूनच त्यांच्या आदेशाचे पालन केले. त्यांचा नामस्मरणावर खूप जोर असे. ते सद्‌गुरु आणि निराकाराशी सदैव जोडून असायचे, म्हणूनच त्यांनी दिलेले आशीर्वाद व त्यांच्या मुखातून निघालेला कल्याणकारी शब्द निराकार प्रभु ऐकत असे. त्यामुळेच त्यांना बेताज पातशाह असे म्हणत.

भापा रामचन्दजींना ब्रह्मज्ञान बाबा बुटासिंहजींच्या काळात भगिनी शकुंतलाजींकडून झाले.

रामचन्दजींचा परिवार धार्मिक वृत्तीचा असल्याकारणाने ग्रंथाचे पठन-पाठण होत असे. म्हणूनच त्यांच्या मनात लहानपणापासूनच ईश्वरदर्शनाची अभिलाषा होती. ते अनेक जणांसमोर ईश्वराला पाहण्याची इच्छा प्रकट करत. परंतु ईश्वराला पाहण्यासाठी अनेक जन्म घ्यावे लागतात, प्रभु प्राप्ती इतकी सोपी नाही, की एक सामान्य मनुष्य प्राप्त करु शकेल, असे त्यांना उत्तर मिळे.

एक दिवस भगिनी शकुंतलाजींचे शब्द त्यांच्या कानावर पडले. सर्वांपेक्षा ते शब्द काही वेगळे होते. त्यांनी शंकुतलाजींसमोर नम्र भावनेने ज्ञानचर्चेसाठी वेळ मागितला. शकुंतलाजींनी होकार दिला आणि घरी बोलावले. भापा रामचन्दजींची ईश्वराविषयी जिज्ञासा पाहून शकुंतलाजींनी त्यांना ब्रह्मज्ञान प्रदान केले. त्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद पहायला मिळाला.

मित्रांनो, आज आपणही पूर्ण गुरसिखाप्रमाणे आपले जीवन बनवले पाहिजे. सद्‌गुरुने दिलेल्या नामस्मरणाने सदैव निराकार प्रभुचे ध्यान केले पाहिजे. निष्ठावान आणि गुरमताप्रमाणे व्यवहार व कर्म करुन या सत्याच्या ज्ञानाशी इतरांना जोडले पाहिजे.

- संदर्भ : ज्योति स्तंभ (भाग -१)

❑ संग्राहक : अंकित चं. जाधव

दिव्य वाणी

# सुंदर जीवन



सृष्टीची विविधता सुंदरतेचे प्रतीक आहे. सृष्टीमध्ये विविधता आहे आणि ती राहणारच. माणसांमध्ये पोशाख, राहणीमान, भाषा, संस्कृती या आधारे भिन्नता राहील. परमात्म्याने जगाची रचना अती सुंदरतेने केली आहे. कुठे डोंगर आहेत, कुठे वाळवंट आहेत, झरे, समुद्र, नद्या ही विविधता सुंदरतेचे प्रतीक आहे. हे सर्वकाही असून एकतेची आवश्यकता आहे. अशा फुलदाणीप्रमाणे एक फुलदाणी जिच्यामध्ये निरनिराळ्या प्रकारची रंगीबेरंगी फुले एकाच ठिकाणी शोभून दिसत आहेत. ती भांडत नाहीत, परंतु माणसामध्ये ही गोष्ट नाही. जर माणूससुध्दा अशा विविधतेत राहून एकतेने राहायला शिकेल, तर धरतीसाठी अभिशाप न होता वरदान बनेल.

जीवन सुंदर बनविण्यासाठी सत्याला जीवनाचा आधार बनवावे लागेल. जीवनात शांती-सुख तेव्हाच येऊ शकते जेव्हा आम्ही सद्‌भावाने युक्त होऊ. खऱ्या अर्थाने जर मन शुध्द आणि पवित्र झाले तर जीवन सुंदर बनेल. जीवनाचा शृंगार मनाच्या अवस्थेवरच अवलंबून आहे. जीवन सुंदर झाले तर शारीरिक अस्तित्वसुध्दा सुंदर वाटेल.

सदैव काळापासून दोन्हीही बाजू आहेत. एक अंधकाराची आणि दुसरी प्रकाशाची. एका बाजूला धीर आणि संतोष आहे तर दुसऱ्या बाजूला उतावळेपणा. एक नम्रता दुसरा अभिमान. या दोन्ही बाजू काटे आणि फुलांप्रमाणे आहेत. आता माणसालाच निवड करायची आहे की कोणत्या मार्गाचा अवलंब करायचा आहे ? अंधकाराचा की प्रकाशाचा. यामुळेच संतजनांनी उज्ज्वलता स्वीकारण्याची शिकवण दिली आहे.

विशेष

# पुण्यात पाच मुलींनी लावला सहा लघुग्रहांचा शोध

अंतराळाचे अनाकलनीय व अनंत गूढ उकलण्याच्या कामी पुण्यातील काही उभरत्या मुलींनीही योगदान दिले आहे. पुण्यातील पाच मुलींनी चक्क सहा लघुग्रहांचा प्राथमिक शोध लावला आहे. पुण्यातील आयुका या संस्थेत संशोधन करत असताना इंटरनॅशनल अस्ट्रॉनॉमिकल सर्च कोलॅबरेशन या मोहिमेच्या माध्यमातून आयोजित शोधमोहिम स्पर्धेअंतर्गत त्यांनी हा शोध लावला. ॲस्ट्रोसाईड्स या नावाने या मुलींचा गट कार्यरत होता. त्यामध्ये क्षितिज अंगलुरी, तनिष्का सोनी, कांचन काळुंगे, केतकी देशपांडे, अनुश्री मोरे यांचा सहभाग होता.

पृथ्वीभोवती फिरणाऱ्या लघुग्रहांचा शोध लावण्यासाठी अनेकदा शोधमोहिमा काढल्या जातात. त्यातीलच ही एक मोहीम असून, तीत इंटरनॅशनल ॲस्ट्रॉनॉमिकल सर्च कोलॅबरेशन चा मुख्य सहभाग आहे. या शोधमोहिमांमध्ये जगभरातून अनेक शाळा-महाविद्यालये व विज्ञानप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी होतात. मागील वर्षी २३ सप्टेंबर ते २१ ऑक्टोबर २०१६ दरम्यान झालेल्या स्पेस जनरेशन ॲडव्हायजरी कौन्सिलिंग या शोधमोहिमेत त्यांचा गट सहभागी झाला होता. जगभरातून २० गटांची निवड करण्यात आली होती. त्यात भारतातील हा एक गट होता.

लघुग्रहांचे हे प्राथमिक शोध माइनर सेंटर (हावर्ड) येथे पाठविण्यात येतात. तेथे या शोधांचे पुढील विश्लेषण होऊन अंतिम शोध सांगण्यात येतात. या लघुग्रहांना नाव देण्याचा अधिकार त्याच्या संशोधकांना दिला जातो. जसे विश्वनाथ आनंद व कवी कुसुमाग्रज यांची नावे यापूर्वी दिली गेली आहेत. "छोटे-मोठे लघुग्रह पृथ्वीला धडकले, तर धोका आहे. या शोधामुळे या धोक्यापासून वाचण्यासाठी प्रयत्न करता येईल." असे केतकी देशपांडे हिचे म्हणणे आहे; तर क्षितिज अंगलुरी म्हणते की, "लघुग्रहांचा शोध लावल्यानंतर खूपच आनंद होतोय. या लघुग्रहांच्या शोधासाठी आम्ही दिवस-रात्र काम केले आहे; त्याचे चिज झाले."

आयुका चे सहकार्य : या शोधमोहिमेतून ४६ लघुग्रहांचा प्राथमिक शोध नोंदविला गेला. त्यापैकी १० लघुग्रह भारतातून शोधण्यात आले. या १० शोधांपैकी सहा शोध ॲस्ट्रोसाईड्सने नोंदविले. ते नोंदविण्यास आयुकाने मदत केली. तेथील समीर धुराडे यांनी त्यांना सहकार्य केले. या लघुग्रहांचा शोध यापूर्वी कोणी लावलेला नाही. आयुकाने या शोधासाठी सायन्स सेंटरमध्ये कॉम्प्युटरची सोय केली. डेटा डाउनलोडसाठी त्याचा वापर केला गेला. सूर्यमालेत असलेल्या लघुग्रहांचे अस्तित्व जाणून घेण्यासाठी हा शोध महत्त्वपूर्ण आहे. मोठ्या टेलिस्कोपद्वारा अधिक संशोधन शक्य आहे. आपणही आपल्या शिक्षकांच्या मदतीने पुण्यातील आयुका या संस्थेत संशोधन करण्यासाठी मार्गदर्शन घेऊ शकता.

❐❐❐

# हसा मुलांनो हसा



बाबा : बबल्या सांग बरं, दहा नारळांपैकी सात नारळ नासले तर किती नारळ शिल्लक राहिले ?
बबल्या : दहा.
बाबा : ता कसा ?
बबल्या : अहो बाबा, नासलेले नारळ सुध्दा नारळच राहतील ना! त्यांचा काय फणस होणार ?



पुण्याच्या एस्.टी. स्टँडवर कॉलेजच्या ३-४ मुली बसमध्ये बसलेल्या असतात. एक मुलगी कंडक्टरला तुच्छतेने विचारते - हे डबडं केव्हा हलणार इथून ?
कंडक्टर शांतपणे म्हणतो : कचरा भरल्यानंतर लगेच!



नेता : (कार्यकर्त्याला) अरे मोहन, या प्रचार दौऱ्यामुळे माझे पाय खूप दुखत आहेत, जरा दाबून देतोस का ?
कार्यकर्ता : होय साहेब.
नेता : (थोड्या वेळाने) जरा एक ग्लास गरम पाणी देतोस का ? गळा खूप दुखतोय.
कार्यकर्ता : पाणी कशाला ?.... गळा दाबून देतो ना!



बन्याचं लग्न काही जमेना. जेमतेम एक स्थळ सांगून आलं. मुलीकडचे त्याचं घरदार पहायला येणार होते. बन्या जाम खूश होता. तेवढ्यात चार-पाच जण घरात प्रवेश करतात. त्यांच्यापैकी एक पाहुणा - अरे वा! घर अगदी महालासारखं आहे.
बन्या : हो ना! आम्ही खूप श्रीमंत आहोत.
पाहुणा : मग सोनं-नाणंही बरंच असेल!
बन्या : हो ना, या सर्व तिजोऱ्या दागिन्यांनी भरलेल्या आहेत. अहो, आम्ही खूप श्रीमंत आहोत.
पाहुणा : मग हे घ्या लेटर आम्ही इन्कम टॅक्सवाले आहोत. तुमच्या घराची झडती घ्यायला आलोत.

चोर : महाराज, मी देवळात चोरी केली नाही. त्या पांडुरंगाने माझ्याकडून चोरी करुन घेतली. तुम्हीच म्हणता ना, पांडुरंगाच्या इच्छेनेच सारं काही घडत असतं! मला शिक्षा कशासाठी?
महाराज : तुझं म्हणणं अगदी बरोबर आहे. पांडुरंगाच्या इच्छेने जशी चोरी घडली तशी पांडुरंगाच्या इच्छेने तुला कोतवालाकडून शिक्षा सुनावली गेली; पांडुरंगाची इच्छा.

गुरुजी : गणू, बाबांनी तुला चार आंबे खायला दिले, आईने पाच आंबे दिले आणि मी तीन आंबे दिले तर तू एकूण किती आंबे खाल्लेस?
गणू : माहीत नाही!... कारण मी आंबे खाताना मोजत नाही.

दामूकाका : डॉक्टर, सकाळी श्वास घेताना खूप जड जातं.
डॉक्टर : सकाळी किती वाजता उठता?
दामूकाका : आठ वाजता....
डॉक्टर : लवकर उठत जा... रामदेव बाबांचे लोक सहा वाजताच सगळा ऑक्सिजन ओढून घेतात.

आठवीच्या गोखले मॅडम वार्षिक परीक्षा, निकाल या सर्व कामांनी वैतागून गेल्या होत्या. घरी स्वयंपाक करायचा कंटाळा आला म्हणून त्या एका रेस्टॉरंटमध्ये गेल्या.
वेटर : मॅडम, काय आणू खायला? (मॅडमना मेन्यू कार्ड हा शब्द आठवेना)
गोखले मॅडम : आधी जेवणाचं सिलॅबस घेऊन ये बघू!

बंड्या : मिस, तुम्ही काल रात्री मला फोन करत होता का?
टीचर : नाही.
बंड्या : कमाल आहे. सकाळी माझ्या मोबाईलच्या स्क्रीनवर दिसत होतं. 'मिस कॉल.'

# वेणूबाई

शके १५७६ मधील रामनवमीचा उत्सव आला. तेव्हा साहित्याकरिता आक्का बत्तीसशिराळ्याकडे जायला निघाल्या. जाताना वेणूबाईंना श्रीरघुपतींच्या स्वाधीन केले व मी येईपर्यंत हिच्याकडून सेवा घ्यावी म्हणून प्रार्थना केली. ह्या गोष्टीस दोन दिवस झाले नाहीत तोच वेणूबाईंना हिवताप येऊ लागला. तो इतका की त्यांची वेदना असह्य झाली. त्यांना उठूनसुध्दा उभे राहवेना. तेव्हा त्यांनी काही शिष्यांना सांगून आपणांस उभे राहण्यास शक्ती नाही म्हणून रघुपतींपुढे प्रार्थना करण्यासाठी उभे करावे असे सांगितले. तशा स्थितीतही त्यांनी श्रीरघुपतींकडे सारे लक्ष लावून करुणापर अभंग केला. तो असा

पतितपावना जानकी जीवना।
अरविंद नयना रामराया।।१।।
आक्का गांवां गेली मज व्यथा झाली।
दयाळा राहिली नवमी तुझी।।२।।

ही करुणा ऐकून श्रीरघुपतींच्या नेत्रांतून खरोखरच अश्रूधारा वाहू लागल्या. त्यांनी आपल्या गळ्यातील माळ वेणूबाईंच्या गळ्यात टाकली.

इतक्यात समर्थही तेथे येऊन वेणूबाईंच्या मागे उभे राहून त्यांनी झालेला सर्व प्रकार पाहिला आणि एकदम पुढे येऊन म्हणाले, "वेणू, माझ्यापाशी राहूनही दु:ख झाले असता देहाच्या ममतेस्तव देवाला संकट घालावे, एवढेच शिकलीस वाटते?"

हे ऐकून वेणूबाई दचकल्या आणि हात जोडून म्हणाल्या, "उत्सवामध्ये अडचण होऊ नये, म्हणून असे केले. देहाचा हेतू नव्हता."

समर्थ म्हणाले, "बरे, पुन्हा असे करु नये."

"आज्ञा," म्हणून वेणूबाई आपल्या कामास गेल्या. तेथपासून त्यांचा थंडीताप गेला.

समर्थ नेहमी भोजन एकांतात करीत असत. त्यांच्या पानावर प्रथमच सर्व पदार्थ वाढून ते पान खोलीत नेऊन ठेवीत व पुन्हा समर्थ खोलीतून बाहेर येईपर्यंत कोणीही खोलीत जाऊ नये असा नियम होता.

त्याप्रमाणे समर्थ एकदा खोलीस भोजनास बसले. प्रथमत: वेणूबाईंनी नेवैद्याचे ताट तयार करुन ठेवले. परंतु स्वयंपाकघरात येऊन पाहतात तो एक पदार्थ नेवैद्याच्या ताटात वाढायचा राहिला आहे, असे आढळून आले. म्हणून तो पदार्थ घेऊन त्या लगबगीने खोलीकडे गेल्या. किंचित दार उघडून पाहतात तो आत मारुती विशाल रुप धारण करुन भोजन करीत होते. त्यांनी हुंकार केला. ते उग्ररुप पाहताच वेणूबाई बेशुध्द पडल्या.

सर्व मंडळींची बाहेर पाने मांडली होती. परंतु अकस्मात वेणूबाई पडल्यामुळे कोणासच काही सुचेना. सर्व मंडळी धावाधाव करु लागली. परंतु वेणूबाई सावध होईनात. ह्याप्रमाणे सर्व मंडळी चिंतेत पडली आहेत, तोच समर्थही भोजन आटोपून बाहेर आले. तेव्हा सर्वांनी विनंती केली, "वेणूबाईंना सावध करावे."

समर्थ क्रोधयुक्त स्वराने म्हणाले, "रोजचा

# अहंकारापासून दूर राहावे

ज्या व्यक्तीला अहंकाराचा वारा लागला त्या व्यक्तीचा विकास थांबला असे म्हणतात आणि ते सत्य आहे. थोड्याशा अधिकाराने, पदव्यांनी आणि पदाने अहंकार वाढतच जातो. या जगतात माझ्यासारखा मीच अशी भावना तयार व्हायला लागते. चित्रपट तारकांमध्ये असाच अहंकार मोठ्या प्रमाणात पहायला मिळतो, अशी माणसं जमिनीच्या वर दोन बोटं हवेत चालायला लागतात. ती आंधळी बनतात. त्यांना काही दिसतच नाही. अहंमपणा, मीपणा हा न्यूनगंडच आहे. खरंतर प्रत्येक माणूस आपल्या ठिकाणी तसा खूप मोठा असतो. भिकारी का असेना; पण त्याला त्याचे व्यक्तिमत्त्व असते, दर्जा असतो. आपण कोणाला हीन समजण्याचा आपल्याला काय अधिकार ? प्रत्येकजन श्रेष्ठ आहे; पण हा अहंमपणा आड येतो.

सुट्टीच्या दिवशी अगदी साध्या कपड्यात मी अंगण स्वच्छ करत होतो. एक गृहस्थ आले. म्हणाले, डॉ. पाटील आहेत का ? म्हणालो, आहेत. काय करताहेत ? म्हणालो, तुमच्यासमोर उभे आहेत. ते गृहस्थ चकित झाले. म्हणाले, एवढे मोठे अधिकारी तुम्ही, किती पदव्या घेतल्यात आणि तुम्ही अशी कामं करता ? मी हसून म्हणालो, तर ही लहान कामं नाहीत. ही महत्त्वाची कामं आहेत. मी त्यांच्याशी चर्चा केली. जाताना त्यांना पायाला हात लावून नमस्कार केला. तेव्हा ते गृहस्थ मला म्हणाले, तुमच्याबद्दल वेगळंच ऐकलेलं आम्ही. तुम्ही कडक आहात. शिस्तबध्द आहात, कोणाकडेही पाणी पित नाही. पण प्रत्यक्ष तुम्हाला भेटल्यावर माझ्या साऱ्या शंका फिटल्या. मी हसून म्हणालो, कार्यालयात असतो तेव्हा त्या खुर्चीची कर्तव्ये पार पाडत असतो. मी जरुर शिस्तबध्द आहे. कडक आहे; पण ते आवश्यक असेल तेथे ! मग ते म्हणाले, मला नमस्कार का केला तुम्ही ? अधिकारी असे नमस्कार करत नसतात. मी म्हणालो, तुम्ही माझ्यापेक्षा वयाने, अनुभवाने श्रेष्ठ, ज्येष्ठ आहात. तुम्ही कोण आहात हे महत्त्वाचे नसून माणूस आहात आणि प्रत्येक माणसाचा सन्मान करणे माझे कर्तव्य आहे. अधिकाराची, पद-पदव्यांची, सत्ता-संपत्तीची झुल अंगावरुन जेव्हा फेकून देऊ तेव्हाच आपण अहंपणा, मीपणा काढून टाकू. त्यांनी जाताना तसा शुभाशीर्वाद दिला. गहिवरुन म्हणाले, अख्खी हयात गेली; पण असा विचार केलाच नाही.

आपला राग, भिक माग, अशी म्हण आहे. हा राग, द्वेष, मत्सर, तिरस्कार, अहंकाराला खतपाणी घालतो. कोणीही, काहीही म्हणाला तरी 'धन्यवाद' म्हणावे. आपण माणूस आहोत आणि माणुसकी, आपुलकी, प्रेम, दया, सहानुभूती हे आपले आनंद देणारे साथीदार आहेत हे लक्षात ठेवावे, तरच जगण्यातला आनंद मिळेल. 'अहंकाराचा वारा न लागो मज' या काव्यपंक्तीचा अर्थ लक्षात येईल.

(साभार) ❑❑❑

---

नियम माहीत असताना वेणूने मध्येच का यावे ?"

त्यावर आक्का हात जोडून म्हणाल्या, "मातापिता जिथे आहेत, तिथे मुलाला जाण्यास काय चिंता आहे ? तसा अपराध चुकून झाल्यास मुलाला दंड करणे, योग्य आहे काय ?"

तेव्हा समर्थ हसले आणि "आक्का, एकूण तुम्ही आम्हालाच शब्दांनी सुचविता बरे तर," असे म्हणाले आणि "वेणू, ऊठ." म्हणून हाक मारली. त्याबरोबर वेणूबाई सावध होऊन उठल्या व मग सर्व मंडळींचे भोजन झाले.

❍ क्रमशः



# किट्टी

चित्रांकन व लेखन : अजय कालडा







अगं किट्टी ती दुर्बीण खाली ठेव. ही तुझ्या कामाची वस्तू नाही.
मी तर फक्त बघत आहे मोंटू.
मी ही दुर्बीण स्वतःकडे ठेवून घेते. मोंटू इकडे पाहत नाही आहे.
मुलांनो, आता आपण सर्व प्रात्यक्षिक करणार आहोत. सर्वांनी इकडे लक्ष द्या.


व्वा! मज्जा आली. ही दुर्बीण किती सुंदर आहे.
व्वा! ह्या दुर्बिणीने पाहिल्यानंतर सर्व वस्तू मोठ्या दिसतात. आणि माझी शेपटीदेखील मोठी दिसत आहे.
आई गं! आग-आग. माझी शेपटीला आग लागली. कोणी आहे ? वाचवा! वाचवा!!


अगं किट्टी, हे काय केलंस तू ?
लवकर मला वाचवा. माझी फार आग-आग होत आहे.
हे पहा मुलांनो, आपल्याला ज्या वस्तूचे ज्ञान नाही त्या वस्तूंना हात लावू नये. ज्यावेळी किट्टी दुर्बिणीतून आपली शेपटी पाहत होती त्यावेळी सूर्याची किरणे ह्या दुर्बिणीतून किट्टीच्या शेपटीवर केंद्रित झाली आणि आग लागली.
मला माफ करा मॅडम. मी ह्यापुढे असं कोणतंही काम करणार नाही.

# नाशिक

**मुख्यालय :** नाशिक

**तालुके :** नाशिक, इगतपुरी, पेठ, दिंडोरी, निफाड, देवळा, त्र्यंबकेश्वर, सिन्नर, येवला, मालेगाव, नांदगाव, चांदवड, कळवण, सुरगाणा, सटाणा

**नद्या :** गोदावरी नदीचा उगम, गिरणा, पांझरा, मोसम, दारणा, कादवा, बाणगंगा, आरम, मन्याड.

**खनिजे :** बांधकामासाठी लागणारा दगड

**प्रमुख शेतकी उत्पादने :** ज्वारी, गहू, बाजरी, द्राक्ष, कांदा, डाळिंब, ऊस, भात, भूईमूग, तूर, हरभरा व भाजीपाला

**धरणे :** गोदावरी नदीवर मातीचे धरण गंगापूर, दारणा नदीवर दारणा प्रकल्प, गिरणा नदीवर चाणकपूर व पांझण

## विशेष माहिती :

नाशिक शहर गोदावरी नदीकाठी वसले आहे. गोदावरी नदीचा उगम याच जिल्ह्यातील ब्रह्मगिरीवर त्र्यंबकेश्वर येथे झाला आहे. देशातील बारा ज्योतिर्लिंगापैकी त्र्यंबकेश्वराचे मंदिर हे एक ज्योतिर्लिंग आहे. दर बारा वर्षांनी येथे कुंभमेळा भरतो. त्र्यंबकेश्वर येथे संत निवृत्तीनाथांची समाधी आहे.

नाशिकजवळ गंगापूर येथे भारतातील पहिले मातीचे धरण आहे. सप्तश्रृंग पर्वतावर देवीचे मंदिर आहे. हे महाराष्ट्रातील साडेतीन पीठांपैकी एक आहे.

स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारकांचे अग्रणी स्वातंत्र्यवीर सावरकरांचे जन्मगाव नाशिक जिल्ह्यातील भगूर हे होय. त्यांनी अभिनव भारत ही क्रांतिकारक संघटना नाशिकलाच स्थापन केली.

नाशिक जिल्ह्यातील येवला ही १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दाचे सेनापती तात्या टोपे यांची जन्मभूमी होय. १९३५ साली मी धर्मांतर करणार अशी घोषणा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रथम जेथे केली ते हेच येवला शहर होय. तसेच येवला येथील विणकरांनी विणलेले शालू, पैठण्या, पीतांबर संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिध्द आहेत.

नाशिक येथे यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ व आरोग्य विज्ञान विद्यापीठ आहे.

केंद्र शासनाची सिक्युरीटी प्रेस नाशिक येथे असून तेथे चलनी नोटा, पोस्टाची तिकीटे, पाकीटे, पोस्टकार्ड इ. छापली जातात.

साल्हेर हे राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचे उंच शिखर नाशिक जिल्ह्यात आहे.

प्रभु श्रीरामचंद्राशी निगडीत पंचवटी व तेथील श्रीराम मंदिर, पांडव लेणी आणि दादासाहेब फाळके स्मारक ही स्थळे नाशिकमध्येच आहेत.

नाशिक जिल्ह्यात इगतपुरी येथे विपश्यना या बौद्ध ध्यानमार्गाचे देशातील प्रसिध्द असलेले धम्मगिरी मठ हे केंद्र आहे.

कवीता : सुरेश तिर्लोटकर

# वरुण राजा




वरुण राजा जगतावर या
थोर तुझे उपकार
धरतीवर या जडजीवांना
तुझा खरा आधार।। ध्रु।।

वाऱ्यावर आरुढ होऊनी
वाजत गाजत येशी
झोत विजेचे सोडून
त्यातून सकळांना पाहशी
आहे कसा परिवार ।।१।।

भरभरुन त्या सागरातुनी
आणीतोस तू पाणी
धरतीवर या तृषार्त कोणी
राहू नयेत प्राणी
थोर असा तू उदार ।।२।।

झाडे वेली हर्षीत झाली
वाऱ्यासंगे डोलू लागली
धरणीही आनंदून गेली
लाल हिरवी लेवून लाली
जणू सौभाग्याने सजली
डोंगरावरुनी निर्झर
उड्या मारीती खाली
शोभा ही अपरंपार ।।३।।



कथा

# परिस्थितीची जाण

माधोपूर गावात एक शिवा नावाचा गरीब मनुष्य राहत होता. तो अतिशय कष्टाळू आणि प्रामाणिक होता. तो दिवसभर कष्ट करुन पोटाची खळगी भरत असे. पण गाठीला एकही पैसा शिल्लक राहत नसे. एकदा खूप दिवस श्रम करुन त्याने एक रुपया जमवला. त्याकाळी चांदीची नाणी असत. ते नाणं घेऊन तो शहरात गेला. त्याने गूळ खरेदी केला. तो गूळ गावातल्या बाजारात विकला. त्यात थोडा नफाही मिळाला. मग पुन्हा त्याने शहरात जाऊन आणखी गूळ विकत आणला. गावातल्या आठवड्याच्या बाजारात तो विकला. मिळालेला नफा जमा करुन त्याने धान्याचा व्यापार करायला सुरुवात केली. त्यातही त्याला यश मिळालं. हळूहळू त्याचा व्यापार खूप वाढला. त्याच्याकडे पैसा येऊ लागला. पण त्याने मौजमजा करण्यासाठी

खर्च केला नाही. कारण तो जुने दिवस विसरला नव्हता. पुढे त्याने स्वतःचा कारखानाही सुरु केला.

कारखान्यात जाताना शिवा पगडी घालत होता. त्या पगडीवर त्याने एक रुपयाचं चांदीचं नाणं चिकटवलं होतं. ते पाहून त्याच्या कारखान्यात काम करणाऱ्या एका तरुणाने विचारलं, "मालक, तुमच्याकडे एवढी संपत्ती आहे. तुम्ही पगडीवर हिरे-मोती लावण्याऐवजी हे एक रुपयाचं नाणं का लावलं आहे?" त्यावर शिवा म्हणाला, "बाबा रे! एके काळी मी गरीब होतो. काबाडकष्ट करुन एक रुपया जमवला. त्यावर आज मी एवढा कारभार उभा केला. मला माझ्या आधीची परिस्थिती आठवण रहावी म्हणून मी हा रुपया फेट्यावर लावला आहे. हा रुपया मला कायम माझी कुवत, माझे कष्ट यांची आठवण करुन देतो. यासाठीच मी हे नाणं पगडीवर घेऊन वावरतो."

शिवा आपल्या नोकरांवर मुलाप्रमाणे प्रेम करत असे. तो पुढे म्हणाला, "हे बघा माझ्या लेकरांनो, कष्ट आणि प्रामाणिकपणा असला की ईश्वरही आपल्यावर कृपा करतो. म्हणून पडत्या काळात खचून न जाता कष्ट करा. भरभराट झाली तर ऊतू नका मातू नका. माणसाने प्रभुची कृपा आणि आपली कुवत कधी विसरु नये."

आपल्या मालकाचं बोलणं ऐकून सारे नोकर भारावून गेले.

❑❑❑



## रिमझिम धारा

सरीवर सरी, कोसळ पावसा
नकोस थांबू, घेऊ उसासा

भिजू दे वृक्ष, भिजू दे लता
भिजू दे सारी, धरणीमाता

रिमझिम धारा, पावसाशी मस्ती
यारे या सारे, धमाल नुसती

जिकडे तिकडे, तळी साचव
आम्हाला एकंदर, घरी बसव

लुटू दे आम्हाला, मज्जा थोडी
सोडू दे पाण्यात, कागदाची होडी

कवीता : रामचंद्र आवटे (पुणे)





कथा

# मिठासारखं प्रेम

एक होता राजा. त्याला सात कन्या होत्या. सात सुंदर कन्यारत्ने त्याच्या राजवाड्याची शोभा वाढवित होत्या. राजाचा आपल्या सर्वात लहान मुलीवर जास्त जीव होता.

एके दिवशी राजाने आपल्या मुली आपल्यावर खरंच किती प्रेम करतात हे जाणून घेण्याचे ठरवले. त्याने सर्व मुलींना एकत्रच बोलावले. सर्वात मोठ्या मुलीला पहिल्यांदा आपल्यासमोर बोलावले व विचारले, "मुली, तू माझ्यावर किती प्रेम करतेस?"

राजाने पुन्हा पुन्हा हाच प्रश्न विचारल्याने आपल्या स्वभावाप्रमाणे तिने सांगून टाकले, "बाबा, मला मिठाई खूप आवडते. त्या गोड मिठाईएवढंच गोड गोड प्रेम मी तुमच्यावर

करते." मुलीचे उत्तर ऐकून राजाला खूप आनंद झाला. राहिलेल्या सहापैकी पाच बहिणीनीही थोड्याफार याच भाषेत राजाच्या प्रश्नाचे उत्तर दिले. आता राहिली सर्वात धाकटी. ती जवळ जाताच राजाने मोठ्या प्रेमाने तिला जवळ घेतले व विचारले, "माझ्या फुला, सांग बरं तू माझ्यावर किती प्रेम करतेस ?"

"मी ना, कुठल्याही मुलीने केलं नसेल एवढं जास्त प्रेम मी तुमच्यावर करते." धाकटीने एका दमात सांगून टाकले. राजाला आनंद झाला; पण त्याने धाकटीकडे जास्त म्हणजे नेमके किती हे सांगण्याचा तगादा लावला. धाकटी विचारात पडली. थोड्या वेळाने ती उत्तरली, "जास्त म्हणजे मिठासारखं प्रेम मी तुमच्यावर करते."

ज्या मुलीवर राजाचा सर्वात जास्त जीव होता तिचे हे उत्तर ऐकून राजाला राग आला, तो म्हणाला, "मीठ जास्त झालं तर, सर्व अन्न फेकून द्यावं लागतं, तुला कळत नाही? जा चालती हो येथून." राजाच्या फटकारण्यामुळे ती बिचारी रडत रडत आपल्या आईकडे गेली व तिला सर्व हकिकत सांगितली. आईने तिला जवळ घेतले व तिचा मुका घेऊन म्हटले, की तुझ्या बाबांना मी याबाबतीत समजावेल. त्या राणीने लगेच आचाऱ्यांना बोलावले व एक योजना आखली. रात्रीच्या जेवणासाठी राजा येऊन ताटावर बसला. ज्या वाटीत तो पोळीचा तुकडा बुडवायचा त्या सर्व वाट्यातील भाज्यांमध्ये साखरच साखर घातलेली होती. मिठाच्या एका कणाचाही पत्ता नव्हता. त्या अतिगोड व अळणी भाज्या बघून राजा वैतागला. त्याने विचारले, "कोणत्या मूर्खाने जेवण बनविलं आहे ? त्याला फासावरच देणं योग्य होईल." राणीने विनयाने म्हटले, "महाराज, झालंय तरी काय ?" अगं, एकाही भाजीत मीठ नाही. उलट साखरच घातलीय." असे राजा म्हणताच ती राणी म्हणाली, "जास्त गोड असेल तर, जास्त खाल्लं जाऊ शकत नाही. थोडा वेळ ते बरं वाटलं तरी स्वयंपाकाला मिठाशिवाय लज्जत नाही. मीठ घालून बनविलेलं भोजन रोज रोज प्रियच वाटत असतं. त्यामुळे आपलं आरोग्यही नीट राहतं. परंतु या वेड्या आचाऱ्यांना कोण समजावणार की जेवनात मीठ किती महत्त्वाचे असते ते."

राजा समजून गेला. त्याची चूक त्याच्या लक्षात आली. धाकटीला उचलून घेऊन त्याने तिला कुरवाळले व म्हटले, "माझी ही शहाणी बाहुलीच सर्वात हुशार निघाली बरं!"

❒❒❒

आध्यात्मिक जागृती आणि ज्ञानप्रकाशाने जीवन यात्रा सफल झाली. ज्ञानाच्या प्रकाशामुळे आत्म्याचे आणि मनाचेसुध्दा भ्रम मिटून गेले, जात-पात-संप्रदायाच्या भिंती पडून गेल्या. सत्याचा उजेड प्राप्त केल्यामुळे जीवनात आध्यात्मिक क्रांती स्थापित झाली. जीवनात परिवर्तनच करायचे असेल तर ते चांगल्यासाठी झाले पाहिजे. भक्तच असे असतात, की ज्यांच्याजवळ परहिताचा भाव असतो. त्यांच्या सहवासातच हा अनुभव येतो.

- बाबा हरदेवसिंहजी महाराज

# सामान्य ज्ञान



१) दीपा आंबेकर ह्या मराठी महिलेची कोणत्या शहरातील दिवाणी न्यायालयाच्या न्यायाधीशपदी नियुक्ती झाली ?

अ) लाहोर  ब) टोकिओ  क) न्यूयॉर्क  ड) लंडन

२) डिस्कव्हरी ऑफ इंडिया हा ग्रंथ पं. नेहरुंनी महाराष्ट्रातील कोणत्या ठिकाणी बंदिवासात असताना लिहिला ?

अ) अहमदनगरचा किल्ला  ब) रत्नागिरीचा थिबा पॅलेस

क) आगाखान पॅलेस  ड) शनिवार वाडा

३) १ जुलै, १९९८ रोजी धुळे जिल्ह्याचे विभाजन होऊन कोणता नवीन जिल्हा निर्माण केला गेला ?

अ) मालेगाव  ब) अकोला  क) वाशीम  ड) नंदुरबार

४) कोणत्या शहरातील विमानतळास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात आले ?

अ) पुणे  ब) ओझर  क) नागपूर  ड) लोहगाव

५) ओरोस बुद्रुक हे ठिकाण कोणत्या जिल्ह्याचे मुख्य ठिकाण आहे ?

अ) सिंधुदुर्ग  ब) रत्नागिरी  क) रायगड  ड) ठाणे

६) भारतातील साहित्य क्षेत्रातील सर्वात मोठा पुरस्कार कोणता ?

अ) साहित्य अकादमी  ब) ज्ञानपीठ  क) साहित्यरत्न  ड) जनस्थान

७) महाराष्ट्राच्या उपराजधानीचे शहर कोणते ?

अ) नाशिक  ब) पुणे  क) नागपूर  ड) चंद्रपूर

८) पैठणजवळ जायकवाडी येथे कोणते मोठे धरण आहे ?

अ) नाथसागर  ब) तेर  क) भंडारदरा  ड) मोडकसागर

९) अलीकडेच कोणता कडक कायदा करण्यात आला आहे ?

अ) नशाबंदी  ब) तंबाखूबंदी  क) जमावबंदी  ड) प्लास्टीकबंदी

१०) रामायणातील मेघनाद याच्या आईचे नाव काय होते ?

अ) कैकयी  ब) मंदोदरी  क) तिलोत्तमा  ड) तारा

उत्तरे इतरत्र



# नक्कल करणारा पिचू पोपट

हा छोट्या आकाराचा पोपट, ज्याला इंग्रजीमध्ये व्हर्नल हँगिंग पॅरट असं म्हणतात. बोली भाषेत या पोपटाला पिचू पापेट असं म्हटलं जातं. हा पोपट भारत व पूर्व-दक्षिणी आशियामध्ये आढळतो. भारतात सर्वत्र आढळणारा हा पोपट विशेषतः पश्चिम घाटात आढळतो.

साधारणपणे १४ सेंटीमीटरचा हा पोपट इतर पोपटांप्रमाणे हिरव्या रंगाचाच असतो; परंतु याची शेपूट आणि पाठ लाल रंगाची असते. हा आकारानं लहान असून, याची शेपटी आणि पाठीची बाजू लालसर रंगाची असते. यामुळे तो नेहमी दिसणाऱ्या इतर पोपटांपेक्षा वेगळा दिसतो. पूर्ण वयात आलेल्या पिचू नराच्या गळ्यावर निळसर रंगाचे मोठे ठिपके असतात. नर व मादी पिचू पोपट सारखेच दिसतात; परंतु नर पोपटाच्या गळ्यावर चमकदार काळ्या-निळ्या-हिरव्या अशा मिश्र रंगाची रिंग असते. या पोपटाची चोचही लाल रंगाची व बाकदार असते. फळांचे टणक कवच तोडण्याकरता त्यांच्या चोचीची अशी विशिष्ट रचना केलेली असते. पोपटाच्या बहुतांश जाती या जंगलातल्या इतर प्राणी-पक्ष्यांच्या आवाजाची नक्कल करण्यात तरबेज असतात.

हा पोपट कायम थव्यात राहतो. इतर पोपटांप्रमाणेच हा माणसाच्या सहवासात रमतो. यामुळेच मनुष्यवस्तीतही हा सहज आढळतो. अरण्ये, फळबागा, शेतजमिनी व शहरातील बाग-बगिचांमध्ये यांचा वावर दिसून येतो. हा पक्षी मुख्यत्वेकरुन फळं व बिया खातो. फळं, फुलांचे कोवळे भाग, कळ्या हे याचं मुख्य खाद्य आहे. केळीच्या झाडावरील केळफुल खाणं त्यांना आवडतं. फळा-फुलांचा अतिशय तन्मयतेनं आस्वाद घेणाऱ्या या चिमुकल्या पोपटाचं निरिक्षण करण्यात वेगळीच मजा असते.

हे पिचू पोपट वडाच्या झाडावर राहणं पसंत करतात. झाडाच्या बुंध्यात खोलगट भागात हिरवी पानं व मऊ गवताचा वापर करुन घरटं तयार करतात. प्रजनन काळात मादी यात शुभ्र पांढऱ्या रंगाची तीन ते चार अंडी घालते. ही पिल्लं २० दिवसांनी बाहेर येतात आणि महिनाभरात उडायला सक्षम होतात.

❒ संग्राहक : अंकित जाधव

# करियरच्या नावाने करियर करणारे

विद्यार्थ्यांच्या आयुष्यामध्ये दहावी-बारावीचे वर्ष हे अत्यंत महत्त्वाचे असते. या वळणावरच पुढच्या आयुष्याची ध्येयनिश्चिती होते. कारण दहावी-बारावीच्या परीक्षा दिल्यानंतर आपल्या मुलाने कोणते करीयर करावे? यावर शिक्कामोर्तब होते. तसे पाहिले तर अलीकडे अगदी पाचवी-सहावीपासूनच मुलांच्या करियरची निश्चिती केली जात असते. आठवी-नववीपासून वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षांना विद्यार्थी बसतात आणि त्या लहान वयापासूनच त्यांच्या डोक्यावर करियरचे ओझे लादले जाते. गेल्या काही वर्षांपासूनच तर या करियरच्या नावाने इतका धंदेवाईकपणा वाढला आहे, की मुलांना करियरविषयी मार्गदर्शन करणाऱ्यांनीच स्वत:चे नवे करियर सुरु केले आहे. ज्यांना कुठेच काही फारसा वाव मिळत नाही किंवा ज्यांना आपला मुख्य व्यवसाय सांभाळून सहजपणे एक साईड बिझनेस करता येतो, असे करियरचे मार्गदर्शक आणि सल्लागार जागोजागी दिसू लागले आहेत. दुर्दैवाने त्या सगळ्या करियरच्या भाऊगर्दीमध्ये अनेक वेळेला नेमके कोणते करियर निवडावे याचादेखील गोंधळ उडतो. काही मोठमोठी प्रसारमाध्यमेसुध्दा करियर मार्गदर्शनाच्या नावाखाली स्वत:चे चांगभलं करुन घेत आहेत. खरे सांगायचे तर आज या संबंधामध्ये भाषण ठोकणाऱ्यांचीच जत्रा भरली आहे. प्रत्यक्षात विद्यार्थ्यांचे करियर घडवायचे किंवा आकाराला यावे, अशी प्रत्यक्ष कृती घडताना दिसत नाही किंवा अशा सल्लागारांच्या जत्रेमधून कोणालाही करियरचे निश्चित मार्ग सापडत नाहीत. अशी भाषणबाजी करण्यापेक्षा दहा-दहा दिवसांच्या कार्यशाळा घेऊन प्रत्यक्ष करियरला सुरुवात करुन देणाऱ्या भक्कम संस्थांची गरज आहे. आम्ही मार्गदर्शन करतो आणि मग तुम्हाला काय पाहिजे ते तुम्ही निवडा. असे जबाबदारी ढकलणारे उद्योग उपयोगाचे नाहीत. कारण हल्लीच्या स्पर्धेच्या युगामध्ये विद्यार्थी आणि पालकवर्ग करियरच्याबाबतीत अत्यंत संवेदनशील झालेला असतो. जितक्या मार्गाने याबाबत माहिती मिळवता येईल तेवढी तो मिळवण्याचा प्रयत्न करतो. शेवटी कुठल्या तरी एका निष्कर्षाला त्याला यावे लागते कारण या सगळ्या करियरचा मुख्य संबंध हा दहावी-बारावीत मिळणाऱ्या मार्कांशी असतो. याचा अर्थ त्या मुलाची आवड-निवड किंवा त्याचा एकूण कल याला जास्तीत जास्त तीस-चाळीस टक्के महत्त्व असते. कारण आवड कितीही मोठी असली आणि पुरेसे गुण किंवा मार्क मिळाले नाहीत तर मनामध्ये योजलेल्या करियरची पार धूळधाण उडते आणि मग मिळालेल्या मार्कांवर जिथे प्रवेश मिळेल तिथून त्या विद्यार्थ्यांचा पुढचा प्रवास सुरु होतो. म्हणूनच करियरचे मार्गदर्शन करणाऱ्यांनी नुसत्या भाषणबाजीवर जोर न देता प्रत्यक्ष वस्तुस्थिती काय आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पालकांनीसुध्दा केवळ श्रवणभक्ती न करता कृतीप्रवण झाले पाहिजे आणि आपल्या मुलाला ज्या विषयामध्ये गती आहे त्यासाठी आवश्यक अशा कार्यशाळा त्यांनी निवडल्या पाहिजेत. करियर घडवण्याच्या दृष्टीने ठोस पावले उचलली पाहिजेत.

❒❒❒

# क्रोधाचे पिशाच्च

एकदा भगवान श्रीकृष्ण, बलराम आणि सात्यकी हे तिघे जंगलातून जात असताना रात्रीच्या वेळी काहीच न कळल्याने रस्ता चुकले. जंगल घनदाट होते, तेथे न पुढे जाण्याचा मार्ग दिसत होता ना मागे येण्याचा. तेव्हा तिघांनीही असा निर्णय घेतला आता येथेच एखादी सुरक्षित जागा पाहून विश्राम करायचा आणि सकाळी उठून मार्गस्थ व्हायचे. तिघेही दमलेले होते पण प्रत्येकाने थोडा थोडा वेळ पहारा देण्याचे ठरवले. पहिली पाळी सात्यकीची होती. सात्यकी पहारा करु लागला तेव्हाच झाडावरुन एका पिशाच्याने हे पाहिले, की एक माणूस पहारा करतो आहे आणि दोन जण झोपले आहेत. पिशाच्च झाडावरुन खाली उतरले आणि सात्यकीला मल्लयुध्दासाठी बोलावू लागले. पिशाच्चाने बोलावलेले पाहून सात्यकी संतापला व क्रोधाने पिशाच्चावर धावून गेला. त्याक्षणी पिशाच्चाने आकार बदलला व तो मोठा झाला. दोघांत तुंबळ मल्लयुध्द झाले पण जेव्हा जेव्हा सात्यकीला क्रोध येई तेव्हा तेव्हा पिशाच्चाचा आकार मोठा होई व ते सात्यकीला अजूनच जास्त जखमा करत असे. एका प्रहरानंतर बलराम जागे झाले व त्यांनी सात्यकीला झोपण्यास सांगितले. सात्यकीने त्यांना पिशाच्चाबद्दल काहीच सांगितले नाही. बलरामांनाही पिशाच्चाने मल्लयुध्दास निमंत्रण दिले. बलराम पण क्रोधाने पिशाच्चाशी लढायला गेले तर त्याचा आकार हा वाढलेला त्यांना दिसून आला. ते जितक्या क्रोधाने त्याला मारायला जात तितका त्या पिशाच्चाचा आकार मोठा होत असे. शेवटी तोही प्रहर संपला व आता पहाऱ्याची पाळी भगवान श्रीकृष्णाची होती. पिशाच्चाने मोठ्या क्रोधाने श्रीकृष्णांना आव्हान दिले पण श्रीकृष्ण शांतपणे मंदस्मित करत त्याच्याकडे पाहत राहिले. पिशाच्च अजून संतापले व मोठमोठ्याने ओरडून श्रीकृष्णांना बोलावू लागले पण श्रीकृष्ण मंदस्मित करत शांत भाव जपत राहिले व एक आश्चर्य झाले ते म्हणजे जस जसे पिश्च्याला क्रोध येऊ लागला तसतसा त्याचा आकार लहान होत गेला. रात्र संपत गेली अन् पहाट झाली. शेवटी आकार लहान होत होत पिशाच्याचा एक छोटासा किडा झाला व श्रीकृष्णांनी अलगद त्याला आपल्या उपरण्यात बांधून ठेवले. सकाळी सात्यकी व बलरामांनी रात्रीची कहाणी सांगताच श्रीकृष्णांनी तो किडा त्यांना दाखविला व ते म्हणाले, "तुम्ही क्रोधाने याला कधीच जिंकू शकत नव्हता कारण हे क्रोधाचे पिशाच्च होते. त्याला शांती हेच औषध आहे. क्रोधाने क्रोध वाढतो मात्र त्याचा प्रतिकार हा केवळ शांतभावाने होतो. मी शांत राहिलो म्हणून हे पिशाच्च बघा कसे आता या किड्यासारखे लहान होऊन बसले आहे."

**तात्पर्य :** क्रोधावर संयमानेच विजय मिळविता येतो. क्रोधाला क्रोधाने मारता येऊ शकत नाही. अग्नीने अग्नी विझत नाही त्यासाठी शीतलता धारण करावी लागते.

# चित्र काढा आणि रंग भरा



## सामान्यज्ञान उत्तरे

१) क
२) अ
३) ड
४) क
५) अ
६) ब
७) क
८) अ
९) ड
१०) ब

## शब्दकोडे १६८

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मृ | त्यू | | अ | क | रा |
| सं | त | | लो | ह | | ज |
| ग | | स्व | | म | | स्था |
| का | | दे | व | द | र्श | न |
| रा | के | श | | न | | |
| | श | | ना | ग | पू | र |
| मा | व | लं | क | र | | झि |
| र्च | | का | | | ब | या |

॥ तू ही निरंकार ॥

# वैर - द्वेषाच्या पाडून भिंती
# प्रेमाचे पूल बांधत जाऊया



शंकरराव जाधव
मुखी, वाई तालुका

महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही... एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची खास सोय !



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

**THE COMPLETE FAMILY SHOWROOM**

**मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर । लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते**

सद्‌गुरू की निगाहे करम एक अगर पड जाये,
मुक्कदर फिरसे लिखने को खुदा मजबूर हो जाये...

सद्‌गुरू होता जग का दाता जो चाहे कर सकता है
पत्थर दिल भी गर पैरों को छुले भवसागर तर सकता है

९९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)

फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2016-2018
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2018
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month


।। तुही निरंकार ।।



जनार्दन एच्. पाटील
झोनल प्रमुख-नाशिक क्षेत्र


ऑफिस : गाळा नं. १,४,६,८ महावीर इंडस्ट्रियल इस्टेट,
नारिंगी फाटा, विरार (पूर्व),
ता. पालघर, जि. ठाणे - ४०१३०५ (महाराष्ट्र)
कार्यालय : (०२५०) २५२७३२०/९८२२८८५५२६
ई-मेल : rajinustries2010@yahoo.in
janardanpatil6500@gmail.com
वेबसाईट : www.vijayaengineeringworks.com
www.rajindustries.net.in

मे. विजया इंजिनिअरींग वर्क्स



मॅन्यु : स्पेशालिस्ट प्लास्टिक
इंजेक्शन मोल्ड आणि ब्लो मोल्ड
(घेर ओरम टाईप डाईज)

मे. राज इंडस्ट्रीज




मॅन्यु. फार्मास्यूटिकल्स कॅप्स (कोलॅप्सीबल आणि लॅमी ट्युब कॅप्स),
पेस्टीसाईड पॅकेजींग, एच.डी. आणि पी.पी. बॉटल



बाबाजी कंस्ट्रक्शन कं.

सिडको आणि सरकारमान्य प्राप्त १ रुम हॉल किचन, २ रुम हॉल किचन
दुकानाचे गाळे तसेच इन्डस्ट्रीअल गाळे कर्ज सुविधांसहित योग्य भावात मिळतील.

जनार्दन हा. पाटील राकेश ज. पाटील
अंकित रा. पाटील कुशल रा. पाटील